स्वादमय सकाळचा नाष्टा
मिसळपाव, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडासांबर, मसालाडोसा, उपमा, उत्तपा, शीरा पुरी भाजी,
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी. रोड, अहमदनगर. फोन : ०२४१ २३२७०६०, ९८५०७९९८५०


संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
डॉ. कांकरियांचे साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ०३.०१.२०२५ | अंक नं. २५७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

NAGAR बदलतंय
सकल राजस्थानी
मुख्य प्रायोजक Satalkar Lotus Super Speciality Hospital
आयोजित In Association with
KIBO WORLD SPL NAMOH
FOODIES MELA Season 2
Tasty Treat for Tasty People!
ONLY PURE VEG
3 4 5 JANUARY 2025
10 am to 10 pm
आज पासून सुरु!
FOOD
ENTERTAINMENT
Venue - Pemraj Sarda College Ground, Patrakar Chowk, Savedi, Ahilyanagar

# अहिल्यानगरमधील तिन्ही बसस्थानकातील फोन बंद

## प्रवाशांची होतेयं हेळसांड; वेळापत्रकासाठी मारावे लागतात हेलपाटे; एसटी महामंडळाचा मनमानी कारभार


अहिल्यानगर एसटी महामंडळाच्या बसस्थानकांकडून नागरिकांची हेळसांड होत आहे. (छाया- धनेश कटारिया)

नगर - जनसामान्य नागरिकांना प्रवास करण्यासाठी एसटी महामंडळाची बस म्हणजे एक संजीवनी आहे, मात्र अहिल्यानगर येथील तारकपूर, माळीवाडा बसस्थानकातील फोन उचलत नाही तर पुणे बसस्थानकाचा फोन बंदच असल्यामुळे प्रवाशांना गाड्यांच्या वेळा जाणून घेणे कठीण झाले आहे. नागरिकांना, विद्यार्थ्यांना या तिन्ही बस स्थानकावर हेलपाटे मारावे लागत आहे. काही नागरिकांनी याबाबत विचारणा केली असता कर्मचारी म्हणाले की, फोन उचलण्यास वेळ नाही', काही म्हणाले, 'फोन बंदच बरा, कोणती बस किती वाजता आहे, हे माहीत नसते म्हणून फोनचा वापर केला जातो. त्यातून नागरिकांचा वेळ वाचतो. मात्र एसटी महामंडळाच्या तिन्ही बसस्थानकाचा मनमानी कारभार पाहता नागरिक फोन लावून वैतागतात, त्यांचे काम फोनवर होत नाही त्यांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना या बसस्थानकावर हेलपाटे मारावे लागतात.

काही नागरिकांना, विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या बाहेर दुसऱ्या राज्यात जावे लागते, त्यामुळे जिल्ह्यातून नागरिक या तिन्ही बसस्थानकावरून गाड्या जातात म्हणून फोन करून कोणती गाडी किती वाजता जाणार आहे, या वेळा विचारण्यासाठी फोन करतात मात्र त्यांच्या पदरी निराशा येते.

एसटी महामंडळाच्या अहिल्यानगर विभागाकडून ही गैरवर्तवणूक सुरु असून, नागरिकांची हेळसांड होत आहे. या मनस्तापाचे एसटी महामंडळ तत्काळ दखल घेऊन फोनची व्यवस्था सुरळीत करणार का? असा सवाल प्रवाशी करत आहेत.


जॉगिंग ट्रॅक येथे विजेचा पोल पूर्णपणे वाकला असून, जॉगिंगला येणाऱ्या जाणाऱ्या महिला व पुरुषांच्या अंगावर विजेच्या तारा कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यातील मोठी दुर्घटना टाळण्यासाठी महावितरण कंपनीने सदरच्या पोलची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. (छाया - बबलू शेख)

# जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना पदोन्नती



नगर - जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली. या पदोन्नतीमध्ये राज्यातील ९ आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसा आदेश राज्य शासनाच्या गृहविभागाने काढला काढला आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला हे २०१२ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. सलग १३ वर्षे सेवा बजावल्यानंतर आयपीएस अधिकाऱ्यांना भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती देण्यात येते.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी यापूर्वी श्रीरामपूर, मालेगाव येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. नागपूर शहर पोलीस उपायुक्त, नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक येथे कर्तव्य बजावले. सलग १३ वर्षे सेवा पूर्ण केल्याने त्यांची भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली आहे. सध्या त्यांना आहे त्याच ठिकाणी पदस्थापना देण्यात आली आहे.

याशिवाय मुळच्या नगर जिल्ह्यातील असलेल्या आणि पुणे येथे कार्यरत असलेल्या तेजस्वी सातपुते यांनाही निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली आहे.

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

### लॉगीन आयडीमध्ये बांधकाम व रेखांकनाची

# प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करा

## अहिल्यानगरच्या आर्किटेक्ट इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची आयुक्तांकडे मागणी

नगर - महापालिकेच्या नगररचना विभागात बांधकाम परवानगी रेखांकन संदर्भातील ६० दिवसांपेक्षा जास्त प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावेत तसेच ज्यांच्या लॉगिन आयडी मध्ये सदर प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आर्किटेक्ट इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

यासंदर्भात असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन विविध मागण्यांसंदर्भात चर्चा करत त्यांना निवेदन दिले. नगररचना विभागात बांधकाम परवानगी, रेखांकन इत्यादी कामांसाठी आर्किटेक्ट इंजिनिअर्स यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत वेळोवेळी प्रशासनाला अवगत करण्यात आले असतानाही आयुक्त कार्यालयाकडून याची पुरेशी दखल घेतली गेलेली नाही.

BPMS बाबत अनेक वेळा समक्ष भेट घेऊन अडचणी मांडलेल्या आहेत परंतु सदर संगणक प्रणाली व्यवस्थित चालत नाही.

६० दिवसापेक्षा जास्त प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत व अशी प्रकरणे ज्यांच्या लॉगिन आयडी मध्ये आहेत, त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

एखादा गृहप्रकल्प मंजूर केल्यानंतर त्याबाबत 'महारेरा' कडे प्रारंभ प्रमाणपत्र कन्फर्म करणे सक्तीचे आहे परंतु त्यासाठी मनपा कार्यालयाकडून खूप विलंब केला जातो, याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

यापूर्वी दिलेल्या सर्व निवेदनामधील मुद्दे विचारात घेऊन त्याबाबत योग्य ती कारवाई करावी.

बांधकाम परवानगीची प्रक्रिया सुलभ व गतिमान व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने नोंदणीकृत वास्तुआरेखक, अभियंते इत्यादींना १५०.०० व ३००.०० चौ. मिटर पर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना लघु व मध्यम जोखीम घेऊन परवानगी देण्याचे अधिकार दिलेले आहेत परंतु त्याबाबत अनेक वेळा भेट घेऊनही BPMS मधील अडचणी दूर करून हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. तरी लघु व मध्यम जोखीम प्रवर्गातील प्रकरणे लवकर मार्गी लागावीत यासाठी आवश्यक त्या उपाय योजना कराव्यात, यापैकी १५० चौ. मी. पर्यंतची लघु जोखीम परवानगीची प्रणाली काही प्रमाणात मार्गी लागलेली आहे परंतु मध्यम जोखीम परवानगीची प्रणाली विकसित होणे आवश्यक आहे.

सदर विभागातील अधिकाऱ्यांनी दर पंधरा दिवसांनी प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन सदर प्रकरणे वेळेत म्हणजेच ६० दिवसात निकाली काढण्याबाबत उपाययोजना करावी व याबाबतची जबाबदारी एकाच अधिकाऱ्यावर निश्चित करावी.

संगणीकृत प्रणालीमुळे परवानगीची प्रकरणे विनाविलंब निकाली निघणे अपेक्षीत आहे परंतु (Ease of doing business च्या संकल्पनेनुसार ) प्रत्यक्ष परिस्थिती अगदी उलट आहे. त्यामुळे ३०० चौ. मी. च्या आतील प्रकरणे (First level officer + sanctioning officer) व ३०० चौ. मी. च्या वरील प्रकरणे (First level officer + DTD+ sanctioning officer) अशा पद्धतीने मंजूर होतील, अशी व्यवस्था करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

कार्यालयीन कामाचे पुनर्वाटप होणार असून त्यामुळे बांधकाम परवानगीची प्रकरणे जास्त व्यक्तींकडून हाताळली गेल्यास जास्त विलंब होण्याची शक्यताही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सेक्रेटरी अभिजीत देवी, उपाध्यक्ष विनोद काकडे, विजयकुमार पादीर, सलीम शेख आदींसह सभासद उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने ना.प्रा.श्री.राम शिंदे सभापती विधानपरिषद यांचा ..
सर्वपक्षीय भव्य सत्कार सोहळा
कार्यक्रमाचे अध्यक्ष व शुभ हस्ते
पद्मभूषण .अण्णासाहेब हजारे
प्रमुख उपस्थिती
मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील (मंत्री जलसंपदा, महाराष्ट्र राज्य)
सन्माननीय उपस्थिती
पद्मश्री.पोपटराव पवार (मा. सरपंच, हिवरे बाजार)
मान्यवरांची उपस्थिती
खा. भाऊसाहेब वाघचौरे (शिर्डी लोकसभा मतदारसंघ) । खा. निलेश लंके (अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघ)
आ. शिवाजीराव कर्डीले (नगर राहुरी विधानसभा मतदारसंघ)
आ. मोनिकाताई राजळे (शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघ)
आ. संग्राम जगताप (नगर शहर विधानसभा मतदारसंघ)
आ. रोहित पवार (कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघ)
आ. आशुतोष काळे (कोपरगाव विधानसभा मतदारसंघ)
आ. किरण लहामटे (अकोला विधानसभा मतदारसंघ)
आ. सत्यजित तांबे (विधान परिषद सदस्य)
आ. विक्रम पाचपूते (श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघ)
आ. विठ्ठलराव लंघे (नेवासा विधानसभा मतदारसंघ)
आ. काशिनाथ दाते (पारनेर विधानसभा मतदारसंघ)
आ. अमोल खताळ (संगमनेर विधानसभा मतदारसंघ)
आ. हेमंत ओगले (श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ)
निमंत्रक: अ‍ॅड. अभय आगरकर (शहर जिल्हा अध्यक्ष भाजपा) श्री. राजेंद्र फाळके (तात्या) (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) श्री. अनिल शिंदे (जिल्हाप्रमुख शिवसेना) प्रा. शशिकांत गाडे सर (जिल्हाप्रमुख शिवसेना उबाठा)
सहनिमंत्रक: प्रा.भानुदास बेरड (मा जिल्हाध्यक्ष भाजपा अहिल्यानगर) श्री. किरण काळे (जिल्हाध्यक्ष काँग्रेस महानगर) श्री. संपत बारस्कर (शहर जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी (अजित पवार गट)) श्री. संभाजी कदम (जिल्हाप्रमुख-शिवसेना उबाठा)
शनिवार दि. 04 जानेवारी रोजी सकाळी 10.30 वाजता
स्थळ : माऊली संकुल सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, मनमाड रोड, सावेडी अहिल्यानगर
सौजन्य - श्री.वसंत लोढा
भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## महिला सर्वार्थानं व्हावी सबला...

आज क्रांतीकारी विभूती, स्त्रीभान सुधारक सावित्रीबाई फुले यांच्या जन्मजयंती दिनी त्यांना अभिप्रेत असलेल्या महिला मुक्तीदिन.

आजही समाजात अनाचार, अनागोंदी बोकाळली आहे. स्त्रियांवरती अत्याचार सर्वदूर होतच आहे. म्हणूनच सावित्रीबाईंच्या स्त्रीशिक्षण व जागरविषयीच्या योगदानाचे महत्त्व शालेय जीवनापासून सर्व लाडक्या बहिणींना पुन्हा पुन्हा सांगायचे गरजेचे आहे.

केवळ पतीबरोबर घराबाहेर पडून, शेण–दगडगोट्यांचा मार खाऊन त्या मोठ्या झाल्या नव्हत्या. सावित्रीबाईंनी सामाजिक न्याय, वाढती विषमता दूर होणे व स्वसन्मान जागृत करणे अशी (स्त्री) शिक्षणाची संकल्पना केली होती. स्त्रियांमधील आत्मभान जागृत करून जातीपाती, शुद्र–नीचता विरुद्ध त्या लढल्या.

आजची स्त्री बरीचशी सुशिक्षित, आत्मविश्वासी व अर्थार्जन करणारी झाली असली तरी समाजात तिची होत असणारी गळचेपी, असहाय्यता, तिच्यावर होणारे अत्याचार याविरुद्ध तिला वैयक्तिक व सामूहिकरित्या भक्कमपणे उभे राहावे लागेल. तरच बरेचसे अन्याय कमी होतील.

सावित्रीबाईंनी अवघे आयुष्य वैचारिक जागरण करण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन दिवसांत फार लवकर लग्ने व्हायची. त्यामुळे काही विधवा व्हायच्या. त्यांच्या केशवपनास त्यांनी विरोध केला. अशा विधवांवर गरोदर होण्याचे प्रसंग यायचे म्हणून त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. महिलांनी स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून अर्थ, ज्ञान व संस्कारसंपन्न व्हावी यासाठी त्या झटल्या. त्यांच्या स्मृतीस अभिवादन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



# स्मार्ट विद्युत मीटर बसवून सामान्य नागरिक, व्यापारी, लघुउद्योजकांची पिळवणूक करू नका

नगर – महावितरणद्वारे संपूर्ण महाराष्ट्रासह अहिल्यानगर शहरात स्मार्ट विद्युत मीटर सक्तीचे केले गेले आहे. जनतेचे आर्थिक शोषण करण्याचे काम महाराष्ट्र सरकार व महावितरण यांच्या माध्यमातून देशातील काही भांडवलदारी कंपन्या करत आहेत. अहिल्यानगर शहरात विद्युत स्मार्ट मीटर बसविण्यास पक्षाचा तीव्र विरोध असल्याचे लेखी निवेदन शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांचे नेतृत्वाखाली अधीक्षक अभियंता यांना देण्यात आले. सदर मीटर बसवून सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, लघुउद्योजकांची पिळवणूक करू नका, असा इशारा यावेळी दिला आहे.

यावेळी दशरथ शिंदे, ब्लॉक अध्यक्ष मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक शहर विभागाचे जिल्हाध्यक्ष अनिस चुडीवाला, माथाडी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष विलास उबाळे, महिला शहर जिल्हाध्यक्ष उषाताई भगत, उपाध्यक्ष जाहिदा शेख, दिव्यांग शहर विभाग जिल्हाध्यक्ष मिनाज सय्यद, क्रीडा व युवक शहर जिल्हाध्यक्ष आकाश अल्हाट, युवक उपाध्यक्ष विकास भिंगारदिवे, शहर सामाजिक न्याय युवा आघाडीचे अध्यक्ष गौरव घोरपडे आदीं उपस्थित होत.

काळे म्हणाले की, भारत सरकारकडून ऑगस्ट २०२१ मध्ये याबाबतचा कायदा भांडवलदारी कंपन्यांना फायदा व्हावा, या हेतूने पारित केल्याचे निदर्शनास येत असून जनतेवर वाढीव बोजा टाकण्याचे षडयंत्र तेव्हापासून नियोजित होते असे दिसते. २० किलोवॅट किंवा २७ हॉर्सपॉवर पेक्षा कमी विद्युत दाब असणारे विद्युत उपभोक्ता म्हणजेच सर्वसामान्य कुटुंब, गोरगरीब नागरिक, शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक, लघुउद्योजक यांच्यावर जाणीवपूर्वक अन्यायकारक असे धोरण ठरवून घेतलेला हा निर्णय आहे. मार्च २०२५ पर्यंत विद्युत स्मार्ट मीटर लावण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असून यातून फक्त जनतेचे नुकसान होईल, असे स्पष्टपणे दिसते आहे. सरकारची भूमिका ही जनहित विरोधी व भांडवलदार स्नेही आहे.

काळे पुढे म्हणाले, संपूर्ण भारतात २२ कोटी २३ लाख विद्युत मीटर बदलायचे सरकारचे उद्दिष्ट असून त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांचे मोठे आर्थिक शोषण होणार आहे. त्यास विरोध आहे. यापैकी महाराष्ट्र सरकारकडून महाराष्ट्रातील सुमारे २ कोटी २५ लाख ६५ हजार विद्युत मीटर बदलण्याचा डाव आहे. यासाठी राज्य सरकारने ३९ हजार ६०२ कोटी एवढा खर्च करण्याचे ठरविले आहे. आज पर्यंत महाराष्ट्र राज्यात किमान सुमारे १ लाख ७५ हजार स्मार्ट मीटर कार्यरत आहेत. विद्यमान मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मार्ट मीटर कोणत्या भौगोलिक क्षेत्रात कोणत्या कंपनीकडून विकायचे याचे टेंडर मंजूर केले असून यापूर्वी निवडणूकी आधी त्यांनी सभागृहात असे सांगितले होते की सदर मीटर हे आम्ही सामान्य ग्राहकांसाठी बसविणार नाही. मात्र प्रत्यक्षात तसे न करता आता सदर मीटर हे सामान्य ग्राहकांसाठी देखील बसवण्याचे काम सुरू करण्यात आले. सरकारने दिलेला शब्द न पाळता नागरिकांची फसवणूक सुरू केली असल्याचा आरोप काळे यांनी यावेळी केला.

### शहरात मीटर बसवण्यास तीव्र विरोध, महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना लेखी निवेदन



महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देताना किरण काळे व इतर.

काळे म्हणाले, राज्यामध्ये विविध विभाग करण्यात आले असून या विभागांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्याची कंत्राटे अदानी ग्रुप, एनसीसी कंपनी, मेसर्स जीनस कंपनी अशा भांडवलदारी कंपन्यांना सुमारे रू. २६,९३९ कोटींचे टेंडर राज्य सरकारच्या वतीने देण्यात आल्याची माहिती आहे. सदर कंपन्या या स्मार्ट विद्युत मीटरची निर्मिती करणाऱ्या कंपन्या नसून देखील त्यांना सदर कंत्राटे देण्यात आली आहेत. ती कोणत्या आधारावर देण्यात आली, हा संशोधनाचा विषय आहे. यामध्ये मोठ्या आर्थिक हितसंबंध, देवाघेवाण व घोटाळा झाला असल्याचा आमचा आरोप आहे.

### पैसे कुठून आणणार?

एकूण २,२४,६१,३४६ मीटर करिता तब्बल २६,९३९ कोटी रुपये या कंत्राटी कंपन्यांना दिले जाणार आहेत. यात ६०% रक्कम भारत सरकारच्या वतीने तर ४०% रक्कम ही महावितरण महाराष्ट्र यांच्याकडून दिली जाणार आहे. अगोदरच आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेली महावितरण ही महाराष्ट्राची सरकारी कंपनी हे पैसे कुठून आणणार? कर्ज काढून आणणार काय की वीज उपभोक्त्यांवर आर्थिक बोजा टाकून वसूल करणार? शेवटी यासाठीचे पैसे हे सर्वसामान्य जनतेच्या खिशातून जाणार हे स्पष्ट आहे. सदर विद्युत स्मार्ट मीटरची निर्मिती व जोडणी किंमत ६३०० रुपये प्रति मीटर अपेक्षित असताना या मीटरच्या किमतीत जवळपास दुप्पट वाढ करून १२००० रुपये हे कंत्राट सदर कंपन्यांना देण्यात आले आहे. हा सरळ सरळ घोटाळा असून यामागे प्रस्थापित राज्यकर्त्यांचे मोठे आर्थिक हितसंबंध दडल्याचा आरोप यावेळी काळेंनी केला.

### बेरोजगारीचे संकट

डीआयएससीओएम महावितरणच्या वितरण विभागाचे हे खाजगीकरणाकडे जाणारे धोरण असून विद्युत स्मार्ट मीटर सोबत अकाउंट आणि बिलिंग विभागाच्या अनेक कर्मचाऱ्यांची कपात करण्यात येणार आहे. यामुळे हजारो कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न बेरोजगारी होत निर्माण होणार. विद्युत स्मार्ट मीटरच्या नावावर विद्युत चोरी थांबणार असा खोटा बनाव राज्य सरकार करीत आहे. वास्तविक पाहता २० केव्ही पेक्षा जास्त विद्युत दबाव वापर करणाऱ्या ग्राहकांकडून विज चोरी झाल्याचे बहुदा निदर्शनास आले असल्याचे काळे म्हणाले.

### स्मार्ट मिटरचे तोटे

१. ग्राहकाला सध्या वीज बिल भरण्यासाठी मुभा मिळते. परंतु स्मार्ट मिटर मुळे ग्राहकाला पहिले रु. २००० किंवा त्यापेक्षा जास्त रिचार्जे पहिले करावे लागेल. नंतर लाईट वापरावी लागेल.

२. स्मार्ट मिटरचा बॅलन्स संपल्यावर घरातील लाईट आपोआप बंद होईल. त्यामुळे रात्री अपरात्री रिचार्ज संपल्यास अंधारात बसण्याची वेळ येईल.

३. सर्वसामान्य गरीब जनतेचे आर्थिक नियोजन कोलमडेल. पहिलेच महागाईने वैतागलेल्या जनतेला महावितरण मोठा झटका देत आहे.

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

मोठ्या प्रमाणावर राजकीय सत्ताधारी पक्षांना रसद पुरवणारे अदाणी व इतर तीन कंपन्या जनतेची आर्थिक लूट करून त्यातील रक्कम तीन महिने बिनव्याजी स्वरूपात वापरणार आणि एकीकडे ग्राहकांना प्रीपेड स्वरूपात विद्युत बिलाचे पैसे भरण्यास बंधनकारक करून महाराष्ट्राच्या जनतेचे आर्थिक शोषण करू पाहणाऱ्या या बोगस विद्युत स्मार्ट मीटर योजनेचा आम्ही अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने जाहीर निषेध करत त्याचा विरोध करीत आहोत. सद्यस्थितीत सदर मीटर बसण्याचे काम सुरू केले गेले असून सुरुवातीचे काम पूर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर कामास तात्काळ स्थगिती देऊन ते बंद करण्यात यावे. अन्यथा आम्ही जनहितार्थ याबाबत आक्रमक आंदोलनात्मक भूमिका घेऊ, असा इशारा यावेळी किरण काळे यांनी काँग्रेसच्या वतीने महावितरणला दिला आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी यांना देखील देण्यात आली आहे.

## कत्तलखान्यावरील छाप्यात साडेतेरा लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – नेवासा शहरामधील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ९ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करून १३ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. शेंडे गल्ली भरावाजवळ काटवनात, नेवासा येथे नदीम सत्तार चौकरी व इतर इसमांनी गोवंश जातीची जिवंत जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने डांबून ठेवलेली आढळून आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक येताना पाहून संशयित इसम पळून गेले.

आसपासच्या नागरिकांना विचारपूस करून पळून गेलेल्या इसमांचे नाव विचारले असता त्यांची नावे नदीम सत्तार चौधरी, फिरोज अन्सार देशमुख, शोएब अलीम खाटीक, खलील उस्मान चौधरी, अबु शाहाबुद्दीन चौधरी, मोजी अबु चौधरी, जबी लतीफ चौधरी, अन्सार सत्तार चौधरी व अकील जाफर चौधरी सर्व रा. नाईकवाडी मोहल्ला, नेवासा खुर्द असे असल्याचे सांगितले.

पथकाने घटना ठिकाणावरून १३ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल त्यात १७ गायी, ६ कालवडी व ४ गोर्हे असा मुद्देमाल जप्त केला आहे.

वरील ९ आरोपींविरूध्द नेवासा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (अ), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विलास मुनोत यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील रहिवासी विलास फुलचंद मुनोत (वय ६२, रा.दाणेडबरा) यांचे ३ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मार्केटयार्ड व दाळमंडई येथील मुनोत ब्रदर्सचे ते संचालक होत.

## सौ. राणीताई घाटेशाही यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील रहिवासी सौ. राणीताई नितीन घाटेशाही (वय ४२, रा.सदर बाजार, भिंगार) यांचे २ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पती, २ दीर, नातवंडे असा परिवार आहे. तलाठी नितीन घाटेशाही यांच्या त्या पत्नी होत.

## उद्योजक अशोकराव सोनवणे यांचे निधन



नगर – येथील 'टेक्नोट्रॅक' इंजिनिअर्सचे पार्टनर, धनसंपदा पतसंस्थेचे चेअरमन, आमी संघटनेचे अध्यक्ष उद्योजक अशोकराव सोनवणे (वय ६६, रा. आनंदनगर, गुलमोहोर रोड) यांचे २ जानेवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

### मनपाचे माजी प्रभाग अधिकारी

## अशोक जामगावकर यांचे दुःखद निधन



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचे माजी प्रभाग अधिकारी अशोक वल्लभदास जामगावकर (वय ७२) यांचे २ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले. महापालिकेत शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. ते मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

## मिनाबाई चित्राल यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील रहिवासी मिनाबाई विश्वनाथ चित्राल (वय ६२, रा.जालना–औरंगाबाद) यांचे २ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर जालना अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या दत्तात्रय, अनिल, सुनिल अरकल यांच्या भगिनी होत.

# देशात राहून केरळ राज्याची बदनामी करणाऱ्या नामदार नितेश राणे यांच्यावर खटला दाखल करा

### केरळ राज्याला मीनी पाकिस्तान म्हणणाऱ्या राणेंचा दिवटा नितेशला बडतर्फ करा

नगर – राज्य मंत्रिमंडळात मंत्रीपदाची शपथ घेतलेल्या नितेश राणे याने केरळ राज्य मिनी पाकिस्तान आहे, म्हणून तेथून राहुल गांधी व प्रियांका गांधी निवडून येतात! अशी गरळ ओकत बेताल वक्तव्य केले आहे. केरळ राज्याला मीनी पाकिस्तान म्हणून वक्तव्य करणाऱ्या राणेंचा दिवटा नितेशला बडतर्फ करण्याची मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी केली आहे.

केरळ राज्य हे देशातील राजकीय दृष्ट्या अतिशय सजग व प्रगत राज्य आहे. १०० टक्के साक्षर व डाव्या आघाडीचे सरकार सत्तेवर असलेल्या केरळ राज्याची कोरोना काळात आरोग्य सेवेसाठी केरळ पॅटर्न म्हणून देश व जागतिक पातळीवर नोंद घेण्यात आली होती. देशाला सर्वाधिक परकीय चलन मिळवून देणारे, पर्यटन विकासासाठी आघाडीवर असणाऱ्या अशा राज्याला मीनी पाकिस्तान म्हणून केरळच्या व भारतीय जनतेचा अपमान केला आहे. केरळ राज्याबद्दल आक्षेपार्ह विधाने करण्याची राणेची लायकी नाही. राज्याचा मंत्री या संविधानिक पदावर असलेल्या राणे यांचा मुख्यमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा घ्यावा, बडतर्फ करण्याची मागणी कॉ. लांडे यांनी केली आहे.

भाजपाने राणे कुटुंब धार्मिक तेढ वाढवून राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी नेमलेले आहे की काय? हा प्रश्न उपस्थित करुन नितेश राणे सातत्याने वादग्रस्त वक्तव्य करून समाजामध्ये तेढ निर्माण करीत आहे. राणे यांचे वक्तव्य केवळ निषेधार्ह नसून भारतीय संघराज्याची प्रतिमा खराब करणारे व दोन समाजात तेढ निर्माण करणारे आहे. देशात राहून देशाची बदनामी करणाऱ्या राणेंवर खटला दाखल करण्यात यावा व ताबडतोब अटक करण्यात यावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा निंबळक ग्रामपंचायतीकडून निषेध करण्यात आला.

# सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचा निंबळक ग्रामपंचायतीकडून निषेध

नगर – मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा निंबळक येथील ग्रामपंचायतीच्यावतीने निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना सरपंच प्रियंकाताई लामखडे म्हणाल्या की, गावाचा सर्वांगीण विकास करताना काही कटू निर्णय सरपंच व इतर सदस्यांना घ्यावे लागतात, परंतु असे निर्णय घेतल्यानंतर बऱ्याच वेळेस ग्रामपंचायत कर्मचारी, सदस्य, सरपंच, उपसरपंच यांना शिवीगाळ, धमक्या, मारहाण व हत्यांपर्यंत काही समाजकंटकांची मजल जाते. त्यामुळे शासनाकडून असे प्रकार रोखण्यासाठी तात्काळ कठोरात कठोर कायदे करुन त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लाऊन निषेध केला व मस्साजोग सरपंच हत्याकांडातील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी केली. यावेळी सरपंच प्रियंकाताई लामखडे, उपसरपंच बाळासाहेब कोतकर, उद्योजक अजय लामखडे, ग्रामपंचायत कर्मचारी आदि उपस्थित होते.



अहिल्यानगर–बीड–परळी लोहमार्गाचे काम मागील अनेक वर्षापासून सुरू आहे. शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड जवळील राजुरी पर्यंत झालेल्या या लोहमार्गाची पहिली रेल्वे चाचणी यशस्वी झाली. (छाया – महावीर पोखरणा)

# मिरवणुकीत डी जे चा दणदणाट केल्याने दोघांवर गुन्हा दाखल

नगर – शहरात ख्वाजा गरीब नवाज उरुस निमित्त निघालेल्या मिरवणुकीत डी जे लावून ध्वनी प्रदुषण केल्या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात मंडळाचे अध्यक्ष, आणि डी जे चालका विरूद्ध गुन्हा दाखल करून डी जे जप्त केला आहे.




शहरात ख्वाजा गरीब नवाज उरुस निमित्त निघालेल्या मिरवणुकीत प्रदुषण केल्या प्रकरणी पोलिसांनी जप्त केलेले डी जे चे साहित्य.

नगर शहरामध्ये ख्वाजा गरीब नवाज यांचे उरुस निमीत्त मिरवणुक काढण्यापूर्वी मंडळाचे अध्यक्ष अझहर सय्यद तसेच डी जे चालक मालक नागेश मच्छिंद्र लोखंडे (रा. भिस्तबाग चौक) यांना सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे अटी व शर्ती घालुन मिरवणुक काढणे करिता ध्वनीक्षेपक परवानगी सह भारतीय नागरीक सुरक्षा संहिता १६८ प्रमाणे अटी व शर्ती घालुन नोटीसाची देखील बजावणी करण्यात आली होती. असे असताना मिरवणुकी मध्ये डी जे चा वापर करून कर्णकर्कश आवाजात गाणे वाजवून् जमावातील तरुण मुलाना नाचण्यास प्रोत्साहन देऊन आवेशपुर्ण घोषणाबाजी केली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून मिरवणूकीत डी. जे सिस्टीमचा वापर करुन ध्वनी प्रदूषण केले.

पोलिसांनी मिरवणुकीतील डी जे चे पिरशाहखुंट येथे डेसिबल घेतले असता ते १०९.२ डेसिबल इतक्या मोठ्या आवाजात डॉल्बी स्पिकर लावुन ध्वनीप्रदुषण करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे मंडळांचे अध्यक्ष, डी जे चालक यांना त्याबाबत सांगून पावती दिली असता त्यांनी पावती घेण्यास नकार देवुन ध्वनी प्रदुषण चालुच ठेवले. त्या ठिकाणी लोकांची गर्दी असल्याने व उत्सव साजरा होत असल्याने डी जे तात्काळ ताब्यात घेतले असते तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने मिरवणुक संपल्यानंतर वरील मंडळांचे डी जे चे साहित्य ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी पोलिस हवालदार मच्छिंद्र पांढरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मंडळांचे अध्यक्ष,व डी.जे चालक /मालक यांचे विरुध्द भारतीय न्याय संहिता २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३, १५ व ध्वनी प्रदुषण अधिनियम २००० चे कलम ३,४,५,६ अन्वये गुन्ह्याची नोंद केली.पुढील कारवाई पोलीस अमलदार गायकवाड हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात प्या इन्फ्यूज्ड वॉटर

थंडीच्या दिवसात पाणी पिण्याची इच्छा कमी होते. विशेषतः जर पाणी पूर्णपणे साधे असेल तर काही फरक पडत नाही. अशा स्थितीत तुमच्या साध्या पाण्याला चव चाखायला द्या. आपण विविध औषधी वनस्पती आणि फळांच्या मदतीने इन्फ्यूज्ड वॉटर तयार करू शकता. हे प्यायला छान लागते आणि इतर अनेक फायदे देखील देतात.

## पाककला

### टोमॅटो पुऱ्या

**साहित्य** : टोमॅटो, कणीक, चण्याचे पीठ, ओल्या मिरच्या अगर लाल तिखट, ओवा, मीठ, कोथिंबीर, जिरे, हिंग.

**कृती** : टोमॅटोचा रस काढून घ्यावा. त्यात भिजेल एवढी कणीक व कणकेच्या पाव हिस्सा चण्याचे पीठ घालावे. तसेच चवीप्रमाणे लाल तिखट अगर ओल्या मिरच्या, ओवा, जिरे, कोथिंबीर व चवीप्रमाणे मीठ हे सर्व जिन्नस एकत्र वाटून, तो वाटलेला गोळा त्यात घालावा. तेलाचे मोहन घालून, सर्व एकत्र मळून, घट्ट गोळा तयार करावा. नंतर तेलावर पुऱ्या लाटून त्या तेलात तळाव्यात.

## वास्तू

### शयनगृहाच्या भिंती

✻ शयनगृहातील भिंतींना हलका गुलाबी रंग असावा तसेच पडदे देखील हलक्या गुलाबी रंगाचेच असावेत.

✻ कबूतर, लव्हबर्ड्स यांच्या जोड्या शयनगृहात लावल्याने पती-पत्नींचे प्रेम द्विगुणीत होते.

## सल्ला

शयनगृहात मृत व्यक्तींचे फोटो लावू नयेत ते अशुभ असते.

## सौंदर्य

दह्याने स्नान केल्यास त्वचा स्वच्छ होतेच; पण त्वचेला ओलावा मिळतो. छोटे-मोठे डाग नाहीसे होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, शततारा २१।२४, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०५ वा. ५० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही.

**वृषभ** : पारिवारिक वाद वाढतील. खर्च होईल. अडकलेल्या कामात सुधारणा होईल. आपल्या आरोग्याची काळजी घ्याल.

**मिथुन** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. साथ लाभेल. व्यक्तिगत कामात उन्नति होईल.

**कर्क** : कायदेशीर कामात आत्मविश्वास कमी राहील. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल.

**सिंह** : अडकलेला पैसा मिळेल. गुंतवणूकीतून लाभ होण्याची शक्यता. आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे.

**कन्या** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. नियंत्रण ठेवा. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील.

**वृश्चिक** : नवीन कामांना चालना मिळेल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. आरोग्य मध्यम राहील.

**धनु** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. प्रतिष्ठा लाभेल.

**मकर** : आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता. कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार इतरांवर थोपवाल.

**कुंभ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील.

**मीन** : वातावरण उत्साहवर्धक राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

'तुझ्याकडे रु.५०० आहेत का? मला हवे आहेत?'
'नाहीत, पण धन्यवाद'
'धन्यवाद कशाबद्दल'
'पाचशेची माझी तुला लायकी वाटली म्हणून!'


# जागतिक आश्चर्ये

## सॅनफ्रॅसिंकोमधील बिल्डींग (फेडरल)

सॅनफ्रॅसिकोमधील अभिनव बिल्डींगचे वैशिष्ट्य म्हणजे या बिल्डींगचे डिझाईन म्हणजे नेहमीच्या बिल्डींगसमान नसून जरा वेगळेपण धाडशी असे डिझाईन वापरुन बनविलेले आहे. त्यामागे सामाजिक आणि पर्यावरणपूरक दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून बनविलेली आहे. नैसर्गिक खेळती हवा राहिल अशा हेतूने ती बनविलेली आहे. बिल्डींगच्या टॉपवरुन आकाशात लहरणाऱ्या बागा हे वेगळे वैशिष्ट्य आहे. उघडे जिने कर्मचाऱ्यांच्या सुखसोयींसाठी खास बनविलेले आहेत.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०८५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जयजयकार ४) पगार; पेमेंट ६) अनेकांचे एकदम रडणे; आक्रोश ७) त्रासलेला; परेशान; हैराण ९) अखंड; न तुटता १०) ज्याला वतन आहे असा १३) तोंड; वदन १५) रत्नजडित मंदिर; श्रीकृष्ण १७) तेजस्वी; सतेज १९) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था २०) कामबंद आंदोलन; हरताळ २१) एक फूल; नीरज; राजीव; राजीव; सरोज

**उभे शब्द :-** १) 'जनरेटर'चे मराठी रूप २) चिंता; काळजी ३) सहा तोंडांचा; गणपतीचा भाऊ ४) थोडा वेडा; बावळट ५) नव्याने आलेला ८) स्तुती; प्रशंसा ११) स्त्रियांचा एक दागिना १२) हक्क सांगणारा; दुष्मन; शत्रू; वैरी; फिर्यादी १३) भडकलेला अग्नी १४) दुर्लोकिक प्राप्त झालेला १६) रसाने भरलेला; रसमय १७) पातक; अधर्म १८) जनावर ज्याला बांधतात ती दोरी

**शब्दगंध क्र. ७०८४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | टी | ल | ■ | व | न | मा | ला |
| ■ | का | ट | को | न | ■ | स | ही |
| ना | का | ■ | प | रा | त | ■ | ■ |
| ग | र | ज | ■ | ज | र | त | र |
| र | ■ | न | द | ■ | स | ह | ज |
| मो | ल | क | री | ण | ■ | ■ | ■ |
| था | ट | ■ | ■ | ■ | स | ह | ल |
| ■ | का | र | खा | न | दा | र | ■ |

**फिल्मीचक्कर क्र. ११७० चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जा | ने | वा | ले | ज | रा | ■ | ना |
| ने | ■ | री | ■ | न | ज | रा | ना |
| ते | ■ | स | न | म | ■ | जी | ■ |
| रे | खा | ■ | या | ■ | जी | व | न |
| ना | ■ | आ | ■ | सी | ता | ■ | ■ |
| म | क | स | द | ■ | व | सं | त |
| ■ | स | ■ | ■ | जु | ही | ■ | रा |
| ह | म | रा | ज | ■ | ■ | ली | ना |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : एका हृदयाने दुसऱ्या हृदयाकडे काय मागाव? आयुष्यभराची साथ आणि आभाळाएवढं प्रेम मागावं.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## 'मृत समुद्र' म्हणजे काय?

मृत समुद्र मध्य पूर्वेत आहे. तो इस्रायल व जॉर्डन यांच्या सीमेवर आहे. या समुद्राच्या पाण्यास बाहेर पडायला वाव नाही. खरं तर ते महाप्रचंड सरोवरच आहे. यात वाऱ्याने येणारे क्षार, पाण्याबरोबर येणारे क्षार यांची भर पडते. हे प्रमाण इतके असते की त्यामुळे या सागराच्या पाण्यात कुठलाही सजीव जिवंत राहू शकत नाही. म्हणून या सागराला 'मृत समुद्र' असे म्हणतात.

मृत समुद्र ७७ कि. मी. लांब आहे. त्याची जास्तीत जास्त रुंदी २० कि. मी. आहे. या सागरपृष्ठाची पातळी जागतिक सागर पातळीच्या ३९६ मीटर खाली आहे. या सागराला जॉर्डन नदी येऊन मिळते. शिवाय इतर छोटे-मोठे नालेही मिळतात. यातून फक्त बाष्पीभवनाने जे पाणी जाईल तेवढेच. त्यामुळे क्षार वाहून जायला मार्ग उरत नाही. यामुळे मृत समुद्रात २३ ते २५% क्षार आढळतात.

या समुद्रातून पोटॅश, मॅग्रेशियम क्लोराइड, कॅल्शियम क्लोराइड आणि ब्रोमाइड आदी क्षार काढले जातात.

## लोभी ब्राह्मण

राजा कृष्णदेवरायाची आई अत्यंत धार्मिक होती. एके दिवशी तिने राजाला येऊन सांगितले की तिला दुसऱ्या दिवशी सकाळी ब्राह्मणांना पिकलेले आंबे दान करायचे आहेत. राजाने आपल्या सेवकांना तिच्यासाठी आंबे आणण्यास सांगितले. त्याच रात्री राजाच्या आईचा मृत्यू झाला. राजा खूप दुःखी झाला, पण त्याला आईची शेवटची इच्छा आठवली.

राजाने सर्व आवश्यक धार्मिक विधी पार पाडले. शेवटच्या दिवशी त्यांनी काही ब्राह्मणांना बोलावून त्यांच्या आईची शेवटची इच्छा पूर्ण करण्याचा मार्ग सुचवण्यास सांगितले. ब्राह्मण मात्र लोभी होते. चर्चेनंतर त्यांनी राजाला सांगितले की जर राजाने त्यांना सोन्याचे आंबे दान केले तरच त्यांच्या आईच्या आत्म्याला शांती मिळेल.

राजाने दुसऱ्या दिवशी सकाळी ब्राह्मणांना सोन्याचे आंबे देण्यासाठी बोलावले. तेनालीने हे ऐकले. त्याला ब्राह्मण लोभी असल्याचे लगेच समजले. त्यांना धडा शिकवण्यासाठी त्याने ब्राह्मणांना घरी बोलावले.

दुसऱ्या दिवशी राजाकडून सोन्याचे आंबे मिळाल्याने ब्राह्मणांना खूप आनंद झाला. तेनाली सुद्धा त्यांना काहीतरी चांगलं दान करेल या विचाराने ते तेनालीच्या घरी गेले. परंतु जेव्हा ते तेनालीच्या घरात गेले तेव्हा त्यांना तेनाली हातात गरम लोखंडी पट्टी घेऊन उभा असलेला दिसला.

ब्राह्मणांना धक्का बसला. तेनालीने त्यांना सांगितले की त्यांच्या आईचा संधिवातामुळे मृत्यू झाला होता. वेदना कमी करण्यासाठी गरम रॉडने तिचे शेकण्याची तिची इच्छा होती. त्यामुळे, आईच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी त्याला ब्राह्मणांचे पाय शेकायचे होते..

तेनालीची युक्ती ब्राह्मणांना समजली. लाज वाटून त्यांनी तेनालीला सोन्याचे आंबे परत केले आणि तेथून पळ काढला. तेनालीने सर्व सोन्याचे आंबे राजाला परत केले आणि राजाला ब्राह्मणांनी कसे फसवले हे सांगितले.

बोध : लोभी नसावे आणि जे आहे त्यात आनंदी राहावे.

# रहमते दर्शन (भाग - १)



तभी मैंने उपस्थित सभी लोगों को भजन पर बैठ जाने के लिए कहा। आधे घंटे के पश्चात सबके आश्चर्य का ठिकाना न रहा जब मेरे पिताजी के मृत शरीर में हलचल होने लगी और वे उठकर बैठ गये। मैंने जब अपने पिता जी से हाल पूछा तो उन्होंने बताया कि एक सरदार ने मुझे यमराज से छुड़ाया है। यमराज ने कहा कि महाराज जी, यह आपका जीव नहीं है, यह जीव तो हमारा है। महाराज जी उसे मारने लगे और पूछा कि इसके लड़के ने किससे नाम लिया है? यमराज ने कहा, संत कृपालसिंह जी महाराज से और इसकी घरवाली ने संत दर्शनसिंह महाराज से नाम लिया है। अब बताओ यह जीव किसका हुआ? तो यमराज ने कहा, आपका। फिर उस सरदार ने यमराज को एक सोटी मारी और वह भाग गया। इसके बाद मेरे पिता जी को भी ३ अप्रैल को नामदान मिल गया। इस प्रकार की बहुत सी अनेक घटनायें हैं, जिन्हें यदि मैं बयान करने लगूँ तो अनेकों किताबें लिखी जा सकती हैं। इसलिये महाराज जी की दया का शुक्राना करने में असमर्थ मैं अपनी बात यहीं ख़त्म करता हूँ।

### निरंतर दया प्रवाह

### दया की भीक

मैंने सन् १९६७ में परम संत कृपालसिंह जी महाराज से नामदान लिया। मैं महाराज जी की सेवा करना चाहता था पर मुझे सेवा का मौका नहीं मिला। १९७१ में महाराज कृपालसिंह जी देवलाली आये और मेरे मन की भावना को समझकर मुझे बुलाया और कहने लगे, मैं सत्संग में जो कुछ भी कहूँ, आप उसे मराठी में अनुवाद करके संगत को सुनाइये। मैं नया था, इसलिये महाराज जी के सत्संग का अनुवाद करने में घबराने लगा। महाराज जी ने कहा, घबराओ नहीं, मैं तुम्हारे साथ हूँ। अब मुझे लगने लगा कि महाराज जी मुझसे कुछ काम लेना चाहते हैं। मगर हाय! मेरी किस्मत, महाराज जी ने तीन साल के बाद चोला छोड़ दिया और मुझे कोई ख़ास सेवा न मिल सकी। महाराज जी के चोला छोड़ने के तीन साल बाद मेरी पहली मुलाकात संत-सतगुरु दर्शनसिंह जी महाराज से कृपाल आश्रम में हुई। चोपड़ा साहब ने मेरा परिचय महाराज जी से करवाया। हालाँकि महाराज जी अंतर्यामी थे और सब कुछ जानते थे। परिचय होने पर महाराज जी ने मुझसे कहा कि हमारे मिशन का साहित्य अभी मराठी भाषा में प्रकाशित नहीं हुआ है, आप यह काम शुरू करो। दिलों के जानने वाले सतगुरु ने मेरे दिल का भाव जान लिया और मुझे सेवा का अवसर प्रदान किया। महाराज जी की दया से ही सबसे पहले मराठी भाषा में एक छोटी किताब ओ इंसान! अपने आप को जान यानी हे मानवा! तू स्वतःला ओळख प्रकाशित हुई। इसके पश्चात १९८४ में मराठी 'सत्-संदेश' शुरू हुआ, जो अभी तक चल रहा है। अब तक महाराज जी की ५-६ किताबों का

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

मां-बाप, भाई-बहिन, पति -पत्नी में प्यार तो है, परंतु कहना नहीं पड़ता। वे एक दूसरे पर विश्वास करते हैं इसलिए उन में प्रेम रहता है। यदि प्रेम पाना है, प्रेम करना है, प्रेम देना है तो विश्वास करना भी उतना ही जरूरी है।

आप जो काम कर सकते हैं अथवा जिस काम को करने के बारे आप ने सोचा है उसे आरंभ कर दीजिए। अपने को दुर्बल समझने की भावना वास्तव में सच नहीं होती। दुर्बलता तो मन की 'एक बीमारी' है। जब व्यक्ति यह सोचने लगता है कि यह काम मेरे लिये असंभव है और मैं यह काम नहीं कर सकता तो किसी विज्ञान या किसी टोने टोटके में इतनी ताकत नहीं है कि वह काम करवा सके। अपने शब्दकोश से दुर्भाग्य और असंभव जैसे शब्दों को मन में आते ही बाहर निकाल दें। इस के वजाए सौभाग्य, संभव और निश्चिंत जैसे शब्दों को मन में स्थान दें। अच्छे विचार सभी के दिमाग में आते हैं। परंतु यह एक पक्षी की तरह होते हैं। अगर पक्षी को पिंजरे में केद नहीं करेंगें तो वह उड़ जाएंगे। जैसे ही कोई अच्छा विचार आये उसे तुरंत किसी कागज या कापी में नोट कर लें। जब आप विश्वास जताते हैं तो आप के मस्तिष्क में एक चुंबकीय शक्ति उत्पन्न करते हैं, जो आकर्षण के नियम अनुसार श्रेष्ट को आप की ओर आकर्षित करता है। कोई भी समस्या आती है, उस समय देखो आप के दिल में क्या है। अच्छा या बुरा, कमजोर या शक्तिशाली। आप के पास वही लौट कर आएगा जो आप के दिल में है। काफी लोग कहते हैं, सोचने से क्या होता है, जो होना होगा, खुद हो ही जाएगा। यह गलत सोच है। विचार ही भाग्य का निर्माण करते हैं। मनुष्य ही ऐसा अकेला प्राणी है, जिस ने विचार के बल से इतनी उन्नति की है। इस उन्नति का कारण कल्पना और उत्साह और विश्वास है। एक बार व्यक्ति के दिमाग में कोई विचार आ जाए तो वह प्रेत या देवदूत की तरह प्रभावित करता है। शुभ विचार मनुष्य को देवदूत के समान सुख, सफलता और समृद्धि की ओर ले जाते हैं। अशुभ विचार प्रेत के समान अवनति और पतन के गर्त में ले जाते हैं। अच्छा अन्न अच्छे शरीर का निर्माण करता है तथा अच्छे विचार अच्छे मन का निर्माण करते हैं। जितना मन में सकारात्मक विश्वास होगा उतना ही जीवन में सफल होंगे।

### दिमाग की शक्ती

यदि मन अशांत और स्वास्थ्य खराब है तो आप आपने लक्ष्य की ओर नहीं बढ़ सकते। ऋणात्मक विचार मन में लाने से व्यक्ति दुर्बल हो जाता है। मैं यह नहीं कर सकता और वह भी नहीं कर सकता वाली मनोवृति हमारी शक्ति को कुंठित कर देती है। हमारा मन एक खड्डी के समान है। हमारे विचार एक धागे के समान हैं। यदि विचार निराशावादी, उत्साहहीन तथा उल्लास रहित है तो उन से बुना हुआ कपड़ा भी ठीक नहीं होगा। यदि विचार रूपी धागे सुलझे हुए होंगे, उत्कृष्ट होंगे, साहस से भरे हुए होंगे तो उन से बने वस्त्र टिकाऊ, उपयोगी और सुन्दर होंगे। आप अपने मन में बार बार दोहराएं, आप ठीक वैसे ही मनुष्य हैं जैसा आप बनना चाहते थे। ये विचार आप को अपार शक्ति देंगे। हम लक्ष्य की ओर बढ़ रहे है, इन विचारों से बल मिलता है। जैसा स्वास्थ्य, जैसी कार्य शक्ति और कर्म सामर्थ्य मैं चाहता था, उस ओर मैं बढ़ रहा हूं, ये शब्द मन में दोहराते रहें चाहे केसी भी चुनौती हो। इस विश्वास से आप के जीवन में क्रांति आ जाएगी। जब भूमि में अच्छी खाद डाली जाती है और हवायें भी अच्छी बहने लगती हैं, साथ ही धूप भी खिलने लगती है,

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

१३) ओटी-पोटाला खाज येणे : गर्भावस्थेत ओटीपोटावर व मांड्यांवर ताण पडल्याने स्ट्रेच मार्क्स येतात व खाज निर्माण होते. त्याकरिता मधुर औषधांनी युक्त उदा. गुलाब, जास्वंद, मंजिष्ठा यांनी युक्त तेलाने हलक्या हाताने मसाज करावा किंवा दुर्वांकुर गर्भसंस्कार तेल पोटाला लावले तरी चालते. जुलाब : गर्भावस्थेत आतड्यांवर गर्भाशयाचा ताण पडल्याने व हार्मोन्स बदलाने तसेच जंतूसंसर्गामुळे जुलाब होतात. त्याकरिता लिंबू सरबत, मीठ, साखर, पाणी, आवळा सरबत, मऊ भात व ताक, मुगाच्या डाळीची खिचडी असा आहार घ्यावा. तसेच पुदीना अर्क, बेलफळाचे सरबत घ्यावे. यामुळे जुलाब कमी होतात. आयुर्वेदिक औषधी उपाययोजना : कुटजघनवटी सकाळ-संध्याकाळ २-२ घ्याव्यात. एवढे करूनही जुलाब न थांबल्यास डॉक्टरांच्या सल्लयाने औषधे घ्यावीत व कल्याणकावलेह एकएक चमचा घ्यावा.

१५) अंगावरून पांढरे जाणे : गर्भावस्थेच्या पहिल्या व दुसऱ्या महिन्यांपर्यंत योनीमार्ग हा निळसर व काळपट रंगाचा असतो, कारण बाळाचे पोषण होण्यासाठी गर्भाशयाला व। योनीमार्गाला रक्तपुरवठा जास्त प्रमाणात असतो; त्यामुळे योनीमार्गातून द्रवपदार्थ बाहर पडतो. हे लक्षण प्राकृत असते; परंतु ज्या वेळेला अंगावरून जाणाऱ्या पांढऱ्या पाण्याला घाणेरडा वास येत असेल, योनीमार्गाला आतून व बाहेरून खाज येत असेल, बाहेर येणार पांढरे पाणी दह्यासारखे घट्ट असेल, योनीभागाची आग होत असेल, योनीमार्गातून यणार पाणी पिवळसर रंगाचे असेल, तर 'टायको मोनास व्हजायनालिस, कॅन्डिडा अल्बिकन्स जीवाणूंमुळे योनीमार्गाला जंतूसंसर्ग झालेला आहे असे समजावे.

आयुर्वेदिक औषधी उपाययोजना : अशा वेळेस त्रिफळा क्काथाने किंवा निमक्काथाने सकाळी व संध्याकाळी दोन्ही वेळा योनीधावन करावे. योनीभागाची स्वच्छता ठेवावी. पुष्यानुग चूर्ण घ्यावे. तसेच गर्भपाल रस + त्रिवंग भस्म किंवा अश्वगंधारिष्ट योग यांचा वापर करावा. एवढे करूनही फरक न झाल्यास तज्ञ डॉक्टरांच्या सल्लयाने औषधी उपचार करावेत.

१६) गोंदकाविषयी समस्या : बाळ गर्भाशयातील गर्भोदकामध्ये पोहत असते; त्यामुळे बाळाचे बाहेरच्या वातावरणातील धक्क्यांपासून संरक्षण होते. साधारणतः याचे प्राकृत प्रमाण १ ते २ लीटर असते.

अ) अति गर्भोदक : गर्भाभोवती गर्भोदकाचे प्रमाण हे दोन लीटरपेक्षा जास्त असल्यास त्याला अति गर्भोदक असे म्हणतात. यामध्ये गर्भाशयाचा आकार वाढल्याने गर्भवतीला झालेल्या महिन्यांपेक्षा पोट जास्त मोठे दिसते. गर्भोदक जास्त निर्माण होण्याचे कारण बऱ्याच वेळेला गर्भामध्ये निर्माण झालेल्या विकृतीमुळे होते. अति गर्भोदकामुळे काही बाळांमध्ये जन्मजात विकृती निर्माण होतात. अति गर्भोदक असणाऱ्या गर्भवतींच्या बाळांमध्ये कवटी नसणे, बाळाचे डोके मोठे असणे, मज्जारज्जू दुभंगलेला असणे, अन्ननलिका व श्वासनलिका एकमेकांना जोडलेली असणे, अशा विकृती बऱ्याचदा आढळतात व अशी बालके जन्मानंतर दगावतात. सोनोग्राफीमध्ये बाळामध्ये अशा प्रकारची विकृती आढळली,

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



## अमित गोरे यांना एलआयसीचा एमडीआरटी पुरस्कार प्राप्त

आयुर्विमा महामंडळातील अहिल्यानगर ९५४ शाखेतील विमा प्रतिनिधी अमित गोरे यांना चौथ्यांदा एमडीआरटीचा पुरस्कार मिळाला आहे. व अमेरिका येथे होणाऱ्या जागतिक विमा परिषदेसाठी त्यांची निवड झाली आहे. तसेच अकरा वेळेस शतकवीर हा पुरस्कार मिळाला आहे त्यानिमित्ताने एलआयसीचे चीफ मॅनेजर सुरेश गायकवाड यांनी अमित गोरे यांना सन्मानित केले. याप्रसंगी उपशाखा अधिकारी मकरंद देशपांडे उपस्थित होते. तसेच एलआयसी असोसिएट स्वर्गीय अशोकराव गोरे यांचे ते पुतणे आहेत.

## ज्ञान मंदिरा विषयीचा ५ जानेवारीला कृतज्ञ स्नेह सोहळा

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील अतिशय जुना व वयोवृद्ध लोकांचा आपल्या ज्ञान मंदिरा विषयीचा कृतज्ञ स्नेह सोहळा ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. काही वर्षापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक गाव म्हणजे जामगाव जेथे सरदार महादुजी शिंदे यांचा भुईकोट राजवाडा असलेले प्राचीन ऐतिहासिक संपूर्ण निसर्गाचा वारसा लाभलेले या काळातील पुरातन मंदिराचे गाव म्हणजे जामगाव. अशा या गावामधील दहावी १९५६ सालचे सर्व माजी विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तब्बल ५० वर्षांनी होणार्या या स्नेह मेळाव्याचे आयोजन उद्योजक भरत कोरडे पाटील यांनी केले आहे.

# शाळा सोडलेल्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची शपथ

### भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये आगळ्या-वेगळ्या पध्दतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी



भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये आगळ्या-वेगळ्या पध्दतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. अंशू मुळे, स्नेहालय संचलित बाल भवन प्रमुख उषा खोल्लम, शालेय समितीचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे, सखी सावित्री समिती सदस्या प्राची शेटिया आदी.

नगर - स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरातील भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये पुन्हा शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी अर्धवट शिक्षण सोडलेल्या महिला व मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठीची शपथ घेतली. सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करुन त्यांचा वैचारिक वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी स्त्री शिक्षण अभियानाची शपथ घेण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून अर्धवट शिक्षण सोडलेल्यांना प्रोत्साहित करुन नाईट हायस्कूलच्या माध्यमातून त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

ज्युनिअर कालेज भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये झालेल्या सावित्रीबाई फुले जयंतीच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ. अंशू मुळे, स्नेहालय संचलित बाल भवन प्रमुख उषा खोल्लम, शालेय समितीचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे, सखी सावित्री समिती सदस्या प्राची शेटिया आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. पारस कोठारी म्हणाले की, सावित्रीबाईंनी महिलांसाठी शिक्षणाचे दारे उघडे करुन खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरणाचे बीज रोवले. समाजाचा विरोध झुगारुन त्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य केल्याने आज स्त्रीयांना समाजात प्रतिष्ठा मिळाली आहे. चूल आणि मूल या परंपरेमधून स्त्रीला सावित्रीबाईंनी बाहेर काढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अंशू मुळे म्हणाल्या की, सावित्री बाईंनी रूढी परंपरा झुगारून शिक्षणाने सामाजिक क्रांतीची ज्योत पेटवली. शिक्षणाने कुतूहल जागृत झाले पाहिजे व मिळालेल्या शिक्षणाचा आपल्या जीवनात योग्य वापर करता आला पाहिजे. स्वतःमधील क्षमता ओळखून यशस्वी होण्यासाठी योग्य वाटचाल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

उषा खोल्लम यांनी मुलींनी चार भिंती ओलांडून जग पहावे. जग खूप मोठे आहे. समाजाचा विचार न करता आपल्या ध्येयाशी व विचारांशी प्रामाणिक रहा. ध्येयप्राप्तीसाठी वाटचाल करा, जो शिकेल तो टिकेल! हा संदेश त्यांनी दिला.

सावित्रीची भूमिका साकारलेल्या रात्र शाळेची विद्यार्थिनी निकिता चव्हाण हिने शिक्षणाचे महत्त्व सांगितले. स्वाती होले यांनी उपस्थितांना शिक्षणापासून दुरावलेल्यांना पुन्हा प्रवाहात आणण्याची शपथ दिली. पाहुण्यांचे परिचय अनुराधा दरेकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली साताळकर यांनी केले. आभार वैशाली दुराफे यांनी मानले. यावेळी शालेय शिक्षक गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत,अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, उज्वला साठे, बाळू गोरडे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, शरद पवार, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अशोक शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेज कर, पालक प्राची शेटीया, सीमा भोर, भाग्यश्री कांबळे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# स्त्री मुक्ती दिवसानिमित्त महिलांसाठी प्रेरणादायी व्याख्यान

### रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीकडून आरोग्य व महिला सक्षमीकरणाचा संदेश



स्त्री मुक्ती दिवसानिमित्त डॉ. अश्लेषा भांडारकर यांचे महिलांच्या सक्षमीकरणावर व्याख्यान झाले.

नगर - स्त्री मुक्ती दिन आणि सावित्रीबाई फुले जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीने, जो अहिल्यानगर शहरातील एकमेव महिलांचा रोटरी क्लब आहे, सामाजिक न्याय विभागाच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, मांडवगण, ता. श्रीगोंदा, अहिल्यानगर येथे विशेष उपक्रमांचे आयोजन केले.

कार्यक्रमात डॉ. अश्लेषा भांडारकर यांचे प्रेरणादायी व्याख्यान महिलांच्या सक्षमीकरणावर झाले. तसेच, डॉ. सोनल रासकर यांनीही मुलींना प्रोत्साहित करत आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी मुलींना भविष्याच्या दृष्टीने प्रगतीसाठी नवे दृष्टिकोन दिले.

याशिवाय, शाळेतील १५० मुलींसाठी विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये डेंटल चेकअप, ॲनेमिया तपासणी आणि बोन डेन्सिटी चेकअपचा समावेश होता. मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गुड टच-बॅड टच याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य जनजागृतीसाठी क्लबकडून प्रत्येक मुलीला टूथब्रश व टूथपेस्ट भेट देण्यात आले. याशिवाय, शाळेसाठी स्टीलच्या ग्लासांचे वाटप करून मुलींच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा संदेश दिला.

कार्यक्रमादरम्यान रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीच्या अध्यक्षा रो. मीनल ईश्वर बोरा म्हणाल्या, स्त्री सक्षमीकरण हा केवळ एक शब्द नसून तो एक सकारात्मक बदल आहे, जो शिक्षण, आरोग्य आणि स्वाभिमानाच्या माध्यमातून साध्य होतो. आजचा उपक्रम मुलींच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी केलेला आमचा एक छोटासा प्रयत्न आहे. महिलांच्या आरोग्य आणि शिक्षणावर भर देणे ही समाज उभारणीसाठी अत्यावश्यक बाब आहे.

कार्यक्रमाला रोटरी क्लबच्या माजी अध्यक्षा रो. देविका रेले, मुख्याध्यापिका पारुडे मॅडम, ठोंबरे सर, वडगाव तांदळीचे मुख्याध्यापक कराळे सर तसेच इतर सदस्य उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीचा हा उपक्रम स्वयंसेवा या तत्त्वाशी जोडलेला असून, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि आरोग्य जनजागृतीसाठी उल्लेखनीय योगदान देणारा ठरला आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरण व आरोग्य जनजागृतीचा महत्त्वाचा संदेश समाजात देण्यात आला.

## डोके विद्यालयात विविध स्पर्धेचे, उपक्रमांचे आयोजन



निर्मलनगर येथील डोके विद्यालयात रांगोळी स्पर्धेत विद्यार्थिनींनी आकर्षक रांगोळी काढली. (छाया - विजय मते)

नगर - सावेडी उपनगरात निर्मलनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालय या संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात विविध स्पर्धेचे, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. ग्रामस्वच्छता अभियान यामध्ये परिसराची संपूर्ण स्वच्छता विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी देखील केली. क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा झाल्या.

संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी सावेडी उपनगरात निर्मलनगर परिसरातील कष्टकरी घटकांच्या मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचे भविष्य घडावे या उद्देशाने प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केली. त्याचा उपयोग आज सर्वांना होत आहे. आपला वाढदिवस साजरा करताना शाळेतील मुला मुलींना आरोग्याच्या दृष्टीने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. हिवाळी क्रीडा स्पर्धा, ग्राम स्वच्छता अभियान राबविले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये लिंबू चमचा, लंगडी, खो-खो, संगीत खुर्ची, ११० मीटर धावणे, रांगोळी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे देण्यात आली. विद्यार्थ्यांना मिष्टांग भोजन देण्यात आले.

विविध स्पर्धा, उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. ज्योती पवार, मंदाकिनी पांडुळे, आशा धामणे, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, संजोग बर्वे तसेच साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार, भरत जगदाळे, राणी राऊत आदींनी परिश्रम घेतले.



महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालयात पोलीस दलाची माहिती घेताना मेहेर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थी.

# विद्यार्थ्यांना पोलीस दलाची माहिती व जनजागृती व्हावी

### उमेश परदेशी यांचे प्रतिपादन; मेहेर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतली पोलिसांची कार्य पध्दती व बंदुकीची माहिती

नगर - आज संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिवस उत्साहाने साजरा होत आहे. २ ते ८ जानेवारी या आठवड्यात पोलीस स्थापना दिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जनजागृती रॅली, शाळेतील विद्यार्थ्यांना पोलिस दलाविषयीची माहिती, तसेच पोलिसांकडून विविध सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात. आज शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस दलाची माहिती सांगून विविध वापरण्यात येणाऱ्या हत्यारांची व बंदुकींची माहिती देण्यात आली. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना पोलीस दला विषयी माहिती असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पोलीस होण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन पोलीस मुख्यालयातील राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी केले आहे

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे मेहेरे इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतली पोलीस दलाची माहिती. याप्रसंगी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, पो.नि. उमेश परदेशी, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरीता झगडे आदींसह विविध शाळांचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा.अनुरीता झगडे म्हणाले, विद्यार्थ्यांना पोलीस दलाविषयीची माहिती मिळाली. तसेच आपणही पोलीस बनावे यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आहे.

या उपक्रमासाठी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे.

# स्त्री शक्ती समाजात बदल घडवू शकते

### अनिता काळे यांचे प्रतिपादन; प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने गौरवपूर्ण सन्मान



प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांचा गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला.

नगर - सर्व महिलांनी एकत्र केलेला गौरवपूर्ण सत्कार हा एका मोठ्या पुरस्काराप्रमाणे आहे. स्त्री शक्ती समाजात बदल घडवू शकते. महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी महिलांना संघटित करुन हे कार्य चालवले जात आहे. ग्रुपच्या माध्यमातून देखील सातत्याने महिलांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. ग्रुपच्या वतीने करण्यात आलेला सत्कार हा भविष्यात आनखी कार्य करण्याची ऊर्जा देणार असल्याचे सत्काराला उत्तर देताना अनिता काळे यांनी सांगितले.

प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांचा गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. काळे यांची दुबई येथे होणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी निवड व रयत शिक्षण संस्थेच्या कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सर्व महिलांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

पांढरीपूल येथील आठवण हॉटेलच्या परिसरात हा सन्मान सोहळा रंगला होता. यावेळी प्रतिभा भिसे, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा अलकाताई मुंदडा, सावेडी ग्रुपचे अध्यक्ष रजनी भंडारी, उपाध्यक्ष उषा सोनी, खजिनदार मेघना मुनोत, आशा गुंदेचा, सचिव रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, शोभा भालसिंग, हेमा पडोळे, आरती थोरात, रेखा मैड, ज्योती गांधी, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, अलका वाघ, अर्चना बोरूडे, संगिता घोडके, सुजाता कदम, सुनीता काळे, सुरेखा जंगम, लीला अग्रवाल, शकुंतला जाधव, शशिकला झरेकर, आशा गायकवाड आदी उपस्थित होत्या.

प्रतिभा भिसे म्हणाल्या की, महिलांनी सर्वच क्षेत्रात आपल्या कार्तकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. अनिता काळे या सातसमुद्रापकीकडे जावून आपल्या मातीतला इतिहासाचा प्रचार-प्रसार करीत आहे. सातत्याने त्या राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर व्याख्यानातून महिलांमध्ये जिजाऊंचे संस्कार रुजवित आहेत. जिल्हा परिषद शाळेत आदर्श शिक्षिका म्हणून कार्य करताना मुलांना दर्जेदार शिक्षणासह संस्कार रुजविण्याचे कार्य त्या करत आहे. त्यांची झालेली निवड ही सर्व महिलांसाठी अभिमानास्पद गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

अलकाताई मुंदडा म्हणाल्या की, ग्रुपच्या उपाध्यक्षा असलेल्या अनिका काळे या अष्टपैलू व्यक्तीमत्व असून, महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी त्या सातत्याने योगदान देत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे सुरु असलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्या व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे कार्य करत आहे. अहिल्यादेवींच्या नावाने त्यांना मिळालेला पुरस्काराने ग्रुपच्या सर्व महिलांना आनंद झाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक स्पर्धा घेण्यात आल्या. यामधील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. आशा गुंदेचा या ज्येष्ठ महिलेच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हेमा पडोळे यांनी केले. आभार आरती थोरात यांनी मानले.

# लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतून क्रिकेटरची निर्मिती

### डॉ. हर्षवर्धन तन्वर यांचे प्रतिपादन; एस के क्रिकेट अकॅडमी आयोजित अहिल्यानगर एपीएल प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण



एस के क्रिकेट अकॅडमी आयोजित अहिल्यानगर एपीएल प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुण्यांसमवेत खेळाडू. (छाया - लहू दळवी)

नगर - अहिल्यानगर लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन होणे ही काळाची गरज बनली असून एस के क्रिकेट अकॅडमीच्या माध्यमातून टर्फ विकेट मैदानावर स्पर्धेचे आयोजन करून चांगल्या क्रिकेटरची निर्मिती करत आहेत. खेळाडूंना बाल वयातच दर्जेदार सुविधा मार्गदर्शन देण्याचे काम क्रिकेटपटू संदीप आडोळे करत आहे. पुणे, मुंबई सारख्या सुविधा आता अहिल्यानगर शहरात मिळत आहे, खेळातून ऊर्जा मिळत असून चांगला नागरिक घडत असल्याचे प्रतिपादन डॉ. हर्षवर्धन तन्वर यांनी केले.

एस के क्रिकेट अकॅडमी आयोजित १२ वर्षाखालील अहिल्यानगर एपीएल प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. यावेळी डॉ. हर्षवर्धन तन्वर, संदीप आडोळे, संदीप पडोळे, सुनील ढमाले, प्रीतम पवार, अशोक जाधव, दादासाहेब मडके, बापू धाकतोंडे, रामकृष्ण इथापे, दत्ता पवार, प्रशांत अंतेपेल्लू आदीसह खेळाडू, पालक वर्ग उपस्थित होते.

स्पर्धेमध्ये ९ संघ सामील झाले असून साखळी पद्धतीने खेळविण्यात आले. याचा अंतिम सामना अहिल्यानगर सुपर किंग विरुद्ध गॅलेक्सी नॅशनल स्कूल यांच्यामधील सामना अटीतटीचा झाला असून अहिल्यानगर सुपर किंग संघाने १४ धावांनी विजय मिळवत विजेतेपद मिळविले या स्पर्धेमध्ये सारंग आत्री यांनी ४१ धावा करत दोन विकेट मिळवले असल्यामुळे त्याला मॅन ऑफ द मॅच देण्यात आली. मॅन ऑफ द सिरीज प्रज्वल इथापे, बेस्ट बॉलर तौसिफ़ शेख तर बेस्ट बॅट्समन सारंग आत्री, बेस्ट फिल्डर मोहम्मद खान यांना देण्यात आले असल्याची माहिती संदीप आडोळे यांनी दिली.



## रेझिंग डे निमित्त पोलिस दलाचा स्नेहबंध फौंडेशनतर्फे सत्कार

पोलिस रेझिंग डे निमित्त जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांचा स्नेहबंध फौंडेशनतर्फे सत्कार करताना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, शिल्पकार बालाजी वल्लाल.

# अहिल्यानगर शहराचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा समाजाला प्रेरणा देत राहील

**आदिनाथ दहिफळे यांचे प्रतिपादन; एसा डायरी, कॅलेंडर २०२५ चे प्रकाशन सोहळा आणि मनोहर आणेकर यांचे आर्किटेक्चरल डिझाइन या विषयावर व्याख्यान**



एसा आणि एस आर जे स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एसा कॅलेंडर २०२५ तसेच एसा डायरी २०२५ चा प्रकाशन सोहळा पार पडला. (छाया – लहू दळवी)

नगर – शहराला लाभलेला ऐतिहासिक व धार्मिक वारसाचे जतन व्हावे यासाठी एसा संस्थेचे माजी अध्यक्ष सुरेंद्र धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून कॅलेंडर व डायरीसाठीचे काम हाती घेतले व शहरातील एसा कॅलेंडरमध्ये अहिल्यानगर मधील पुरातन वास्तू अंतरंग या सदराखाली संस्था मागील काही वर्षापासून प्रकाशित करते. यावर्षी चित्रकार अरविंद कुडीया यांचे नगरमधील १२ ऐतिहासीक वास्तू असणारी चित्रे रेखाटून कॅलेंडरच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात आली. या चित्रांची छायाचित्रे निसर्ग छायाचित्रकार संजय दळवी यांनी काढली आहेत. संस्थेचे कॅलेंडर दरवर्षी शहरातील वेगवेगळ्या वास्तूंची चित्रे घेऊन बनवली जात असल्याने त्यास नगरच नाही तर महाराष्ट्र राज्य आणि बाहेरही मोठी मागणी असते. त्यामुळे आपल्या शहराचा नावलौकिकात भर पडत आहे. शहराचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा समाजाला प्रेरणा देत राहील. एसाच्या डायरीसाठी झालेल्या खर्चातील बाकी रक्कम एसा भवन बांधकाम निधीसाठी वापरणार असल्याचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी सांगितले

एसा आणि एस आर जे स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एसा कॅलेंडर २०२५ तसेच एसा डायरी २०२५ चा प्रकाशन सोहळा पार पडला. डायरीचे उद्घाटन दर्शना ट्रेडिंग कंपनीचे जितेंद्र मुनोत यांच्या हस्ते तसेच कॅलेंडरचे उद्घाटन इंजि. मनोहर आणेकर, एस आर जे स्टीलचे अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, अरविंद कूडीया, संजय दळवी, संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सचिव अभिजित देवी, उपाध्यक्ष विनोद काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी संचालक भूषण पांडव, सुनिल औटी, प्रदिप तांदळे, नंदकिशोर घोडके, मयुरेश देशमुख, यश शहा, जितेश सचदेव, प्रितेश कांकरिया, मयुरेश देशमुख, संतोष खांडेकर तसेच सभासद आणि व्यवसायिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना अरविंद कूडीया यांनी आर्किटेक्ट इंजिनीअर्स हे शहराचा वास्तूच्या माध्यमातून चेहरा बनवत असून त्यांनी केलेल्या वास्तू शहर सुंदर करण्याचे काम करत असतात. कॅलेंडर मधील वास्तूच्या माध्यमातून शहराचे सौंदर्य इतर नागरिकांना माहिती होण्यास आणि त्याचा प्रसार होण्यास मदत होते. तसेच नूतन आर्किटेक्ट इंजिनीअर्स यांनाही या वास्तूच्या माध्यमातून नवीन कलाकृती घडविण्याची प्रेरणा मिळते. कुडीया यांनी काढलेली चित्रे नवीन संसद भवन आणि राष्ट्रपती भवनात लावण्यात आलेली आहेत.

सभासदांना मार्गदर्शन करताना संजय दळवी यांनी संस्था ही सभासदांना एकत्र आणण्याचे काम करत असून त्या माध्यमातून त्यांच्या व्यवसायातील अडचणी सोडवल्या जात असून नगरमध्ये मैत्री कट्टा याच प्रकारे काम करत असून निखळ मैत्रीच्या माध्यमातून आणि इतरांच्या अनुभवातून आपले जीवन, राहणीमान विकसित करण्याची प्रेरणा मिळू शकते. यावेळी त्यांनी सभासदांना या ग्रूपचा भाग बनण्याचे आवाहन करत ११ जानेवारी रोजी माऊली संकुल येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे आमंत्रण दिले.

यावेळी इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स अहिल्यानगर सेंटरचे माजी अध्यक्ष मनोहर आणेकर यांचे ए प्रिलिमिनरी इंट्रोडक्शन ऑफ आर्कीटेक्चरल डिझाइन प्रिन्सिपल फॉर सिव्हील इंजिनीअर्स या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आर्किटेक्चरल डिझाइनमधील बेसिक कन्सेप्ट यावर सभासदांना योग्य दाखले आणि उदाहरणांसह विस्तृत मार्गदर्शन केले. आर्किटेक्चरल प्रॅक्टिस करताना इमारतींची संमिती, गुणोत्तर, दिशांचा शास्त्रीय अभ्यास विविध फॉर्म्युले अभ्यासले जातात. ज्यांच्यासाठी इमारत करायची त्यांची गरज, अपेक्षा गृहीत धरून त्यासाठी योग्य मटेरियल आणि साहित्य गृहीत धरून प्लॅनिंग करणे आवश्यक असून आर्किटेक्चरल डिझाइन प्रिन्सिपल हा यातील महत्वाचा भाग असल्याचे आणेकर यांनी नमूद केले.

सचिव अभिजित देवी यांनी सुत्रसंचालन केले व सभासद आणि व्यावसायिकांचे आभार मानले.



## एनसीसी छात्रांची डायल ११२ युनिटला भेट

महाराष्ट्र पोलिस दलाच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा पोलिस दलाच्यावतीने सप्ताहभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रेझींग डे निमित्त शुक्रवारी (दि.३) सकाळी आठरे पाटील पब्लिक स्कुल अहिल्यानगर येथील एनसीसीच्या छात्रांनी पोलिस नियंत्रण कक्षातील डायल ११२ युनिटला भेट दिली. यावेळी युनिटप्रमुख पोलिस उपनिरीक्षक अंबादास हुलगे, इंजि. संतोष रसाळ, डिस्पॅचर महिला अंमलदार प्रज्ञा डोंगरे व सुजाता आंधळे यांनी डायल ११२ प्रणाली विषयी या छात्रांना माहिती दिली.

## अष्टपैलू साहित्य भूषण पुरस्काराने विद्या भडके सन्मानित




अष्टपैलू साहित्य भूषण पुरस्काराने विद्या भडके यांना सन्मानित करण्यात आले.

नगर – साहित्य क्षेत्रात सातत्याने करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल नगरच्या लेखिका तथा कवयित्री विद्या रामभाऊ भडके यांना अष्टपैलू साहित्य भूषण राज्यस्तरीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील अष्टपैलू संस्कृती कला अकादमी आणि न्यायप्रभातच्या वतीने आळंदी देवाची (ता. खेड, जि. पुणे) या ठिकाणी झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात भडके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी अकादमीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी खैरे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मधुसूदन घाणेकर, अनुसया खैरे, रितेश अत्तरदे, नंदश्री मठपती, सविता पाटील, अश्विनी कसबेकर, अनिता जगताप, उज्वला बुरुंगले, मुद्रिका शिंदे, रागिणी अत्तरदे, निलेश कसबेकर, प्रताप पाटील, ह.भ.प. प्रल्हाद सुपेकर महाराज, रमेश देवरे, अलका झरेकर, अरुणा कालेकर आदी उपस्थित होते.

लेखिका तथा कवयित्री विद्या भडके नागरदेवळे (ता. नगर) येथील रहिवासी असून, त्या शिवाजी हायस्कूल बोधेगाव (ता. शेवगाव) येथे शिक्षिका म्हणून विद्यादानाचे कार्य करत आहेत.

भडके यांचे साहित्य तसेच काव्य लेखनात असलेले उत्कृष्ट कार्य. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना अष्टपैलू साहित्यभूषण पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे.

# सुसज्ज नेत्रपटल व जबड्याच्या क्रेस्ट आय व ओरोफेशिअल क्लिनिकचे ५ जानेवारीला लोकार्पण

नगर – येथील घुमरे गल्लीतील तांबोळी हॉस्पिटल येथे ५ जानेवारी रोजी क्रेस्ट आय व ओरोफेशिअल क्लिनिक याचे उद्घाटन आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन बेंगलोरचे डॉ. हेमंत मूर्ती, संभाजीनगरचे डॉ. मनोज सासवडे तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती डॉ. सूचित तांबोळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ.तांबोळी यांनी पुढे म्हटले की या उद्घाटनाच्या निमित्ताने डॉक्टरांसाठी रेटीनावर कार्यशाळा स्टेशन रोड वरील हॉटेल राजयोग येथे ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केली आहे. यासाठी डॉ. हेमंत मूर्ती, डॉ. मनोज सासवडे संभाजीनगर, डॉ. मनीष बापये नाशिक, डॉ. राजीव गांधी अकलूज असे वक्ते मार्गदर्शन करणार आहे. डायबीटीस, ब्लडप्रेशरमुळे डोळ्यांवर होणारे परिणाम तसेच कमी दिवसांचे मुलांच्या डोळ्यावर होणारे परिणाम, यावर चर्चासत्र आयोजित केले असून जास्तीत जास्त डॉक्टरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रेटिना तज्ञ डॉ. क्षितीज तांबोळी यांनी केले आहे.



डॉ. सुचित तांबोळी



डॉ. नेहा तांबोळी

डॉक्टर तांबोळी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचा एक भाग म्हणून क्रेस्ट आय व ओरोफेशिअल क्लिनिक येथे सर्व अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात आली आहे. या केंद्रात मधुमेह व रक्तदाब असणाऱ्या पेशंट साठी नेत्र तपासणी, कमी दिवसांच्या बाळाची नेत्र पटल तपासणी, इंजेक्शन थेरपी द्वारे नेत्र पटल आजारांवर उपचार, मार लागलेल्या डोळ्याचे व्यवस्थापन, गुंतागुंतीची अवघड मोतीबिंदू शस्त्रक्रिया, उतार वयातील नेत्रपटलाचे विकार व व्यवस्थापन, अत्याधुनिक लेझर उपचार पद्धती, रेटिना सर्जरी इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर तोंडाच्या कॅन्सर संबंधी सल्ला व उपचार, मार लागलेल्या जबड्याचे व चेहऱ्याचे व्यवस्थापन, रुतलेला दात सर्जरी द्वारे काढणे जबडा व चेहरा यांच्या आजाराचे उपचार, तसेच डेंटल इम्प्लांट याची सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आता नगरच्या पेशंटना पुणे मुंबईला जाण्याची गरजच नाही कारण नगरमध्येच अत्यंत आधुनिक सोयी सवलतीच्या दरात आणि तज्ञ डॉ. क्षितीज आणि डॉ. अर्चना यांच्यामार्फत उपलब्ध करून होणार आहे. अ.नगरचे पहिले नेत्रपटल व जबड्याच्या विकारांसाठी क्लिनिक सुसज्ज करताना डोळे व जबड्याच्या उपचारासाठी कृतीशील ! आपले अहिल्यानगर बनवूया प्रगतशील' !! हेच आमचे ब्रीदवाक्य असल्याचे तांबोळी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर सुचित व सौ. नेहा तांबोळी यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. तुकाराम रामदास कोतकर, रा. सोनेवाडी रोड, केडगाव, ता. जि. अहिल्यानगर, यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशीलास खरेदी देण्याचे ठरविले असून त्याबाबत बोलणी झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसंबंध अगर कब्जा नाही, अशी त्यांनी आमचे अशीलास खात्री दिली असून भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकती मध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, वहिवाट, इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकीहक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसात कागदपत्रां निशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व नीजोखमी आहे, असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कळावे.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

डिस्ट्रिक्ट अहिल्यानगर सब डिस्ट्रिक्ट तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे बुरुडगाव येथील सर्व्हे नंबर १०६/२ यातील प्लॉट नं. ३ याचे क्षेत्रफळ ८८२-८९ चौरस मीटर, ही ओपन प्लॉट मिळकत

**यांसी चतु:सीमा –**

पूर्वेस : प्लॉट नं. ४ | दक्षिणेस : रस्ता

पश्चिमेस : प्लॉट नं. २ | उत्तरेस : सर्व्हे नंबर १०६ पैकी

ठिकाण अहमदनगर

दिनांक: ०३/०१/२०२५

**ॲड. सिध्देश प्रमोद मेहेर**

११, नवजीवन कॉलनी, मार्केट यार्डच्या मागे,

अहमदनगर-४१४००१. मो. ९३७३३६३५३६


# सीए विद्यार्थ्यांसाठी नगरमध्ये दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषद



सीए विद्यार्थ्यांसाठी नगरमध्ये दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषद उत्साहात पार पडली.

नगर – द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटटस ऑफ इंडिया अहमदनगर विकासा शाखेच्यावतीने नगर येथे विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही विद्यार्थी परिषद द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटटस ऑफ इंडियाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या बोर्ड ऑफ स्टडीज नवी दिल्ली अंतर्गत घेण्यात येते.

लघु सूक्ष्म उद्योग या संदर्भातील येणाऱ्या काळातील आव्हाने व संधी, शेअर्स म्युच्युअल फंड गुंतवणूक संदर्भातील सावधानता, आर्थिक धोक्यापासून बचाव, मानसिक ताण तणाव नियोजन, भगवतगीता व गितेचा आपल्या आयुष्यामध्ये वापर, सीए विद्यार्थी परीक्षेची तयारी, सामाजिक बांधिलकी व इतर अनेक विषयावर विविध त्यांचे विचार प्रकट केले.

या परिषदेचे उदघाटन पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले व प्रमुख पाहुणे सीए अशोक गुर्जर हे होते. पद्मश्री पोपटराव पवार यांनी सीए विद्यार्थ्यांना सीए करत असताना सामाजिक बांधिलकी पण जपली पाहिजे आणि निसर्ग हा आपला मित्र आहे जसे आपण निसर्गाला देऊ त्याहून अधिक निसर्ग आपल्याला देत असतो असे सांगितले. आयुष्यामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये खचून न जाता धैर्याने उभे राहायचे असा मोलिक सल्ला त्यांनी दिला.

सीए अशोक गुर्जर यांनी मुलांना प्रेरक असे मार्गदर्शन केले. सीए शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी परिषदेला शुभेच्छा देताना सीए शाखेचा प्रवास मान्यवरांना करून दिला व मुलांना संबोधीत केले.

या परिषदेस महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेल्या बारा विद्यार्थ्यांनी कॅपिटल मार्केट, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अख, लघु व सूक्ष्म उद्योग, आर्थिक साक्षरता, इन्कम टॅक्स, जीएसटी, ऑडिट आणि भारताचे अर्थशास्त्र ईत्यादी विषयांवर आपले मत मांडले. या वेगवेगळ्या आठ सत्रात दिल्ली, कोलकाता, इंदोर, मुंबई, पुणे येथील तज्ञ वकत्यांनी सीए करणार्या विद्यार्थ्यांन मार्गदर्शन केले.

बोर्ड ऑफ स्टडीज चे सीए अश्वनी जिंदाल यांनी विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेले उपक्रम, अभ्यासक्रमातील बदल व येणार्या काळात परिपक्व सीए घडविण्याच्या दृष्टीकोनातून घेण्यात येणारे परिश्रम ह्या संदर्भात मार्गदर्शन केले.

परिषदेच्या सुरवातीला सीए इन्स्टिट्युट अहमदनगर शाखेचे अध्यक्ष सीए सनीत मुथा यांनी उपस्थितांचे स्वागत केले, उपाध्यक्ष व सीए शाखेचे विकासा अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले. सीए शाखा सचिव व विकासा कार्यकारी सभासद सीए अभयकुमार कटारिया यांनी आभार मानले.

सदर परिषद आयोजित करण्यात अहमदनगर शाखेचे अध्यक्ष सीए सनीत मुथा, अहमदनगर सीए शाखेचे विकासा अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, विकासा कार्यकारी सभासद सीए अभयकुमार कटारिया, खजिनदार सीए महेश तिवारी, माजी अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे व सीए पवनकुमार दरक, विकासा समिति सदस्य अभिनव कोठारी, रिद्धी पितळे, ब्राम्ही शिंगवी, ओम सरोदे, ख़ुशी छेडा, संधीनी नारंग यांनी विशेष परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०३/०१/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे केडगांव येथील** खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २९२ | ५३ | ४००.०० चौ. मी. |

**हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील आर सी सी मधील बांधकाम क्षेत्र ७०.९३ चौ. मी. लाईट मीटर, नळ कनेक्शनसह ही आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सीमा –**

पूर्वेस : रस्ता

दक्षिणेस : रस्ता

पश्चिमेस : प्लॉट नंबर ४२

उत्तरेस : प्लॉट नंबर ५२

**विद्यमान मालकांचे नाव–**

**आशा विठ्ठल मतकर**

रा. अरणगांव रोड, केडगांव, अहिल्यानगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**

**ॲड. गणेश एम. शर्मा**

फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५

ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,

दाळमंडई, अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०३/०१/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा **अहिल्यानगर,** पोटतुकडी **नगर** पैकी, **अहिल्यानगर महानगरपालिका** हद्दीतील **मौजे केडगांव** येथील खालील वर्णनाची जागेसह बांधकाम मिळकत–

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १०४/१/२३अ | २४ | ५०.०० चौ.मी. |

**हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील असलेले आर सी सी मधील बांधकाम क्षेत्र २५.०० चौ. मी. लाईट मीटर, नळ कनेक्शनसह ही आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सीमा –**

पूर्वेस : प्लॉट नंबर २३

दक्षिणेस : ४.५ मीटर रुंदीचा रस्ता

पश्चिमेस : प्लॉट नंबर २५

उत्तरेस : प्लॉट नंबर १५

**विद्यमान मालकांचे नाव–**

**उषाबाई बाळकृष्ण भोसले**

रा. मु पो सारोळा कासार ता.जि. अहिल्यानगर

**ॲड.आर.टी.शर्मा**

**ॲड. गणेश एम. शर्मा**

फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५

ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,

दाळमंडई, अहिल्यानगर


# लिलाबाई झोडगे यांना सावित्रीबाई फुले आदर्श माता पुरस्कार



फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त श्रीमती लिलाबाई झोडगे यांना क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले आदर्श माता पुरस्काराने गौरविताना पद्मश्री पोपटराव पवार, 'फिनिक्स'चे जालिंदर बोरुडे आदी.

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भिंगार येथील श्रीमती लिलाबाई भाऊसाहेब झोडगे यांना क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले आदर्श माता पुरस्काराने गौरविण्यात आले.

शुक्लेश्वर मंदिराच्या प्रांगणात झालेल्या शिव पुराण कथेच्या कार्यक्रमात लिलाबाई झोडगे यांना पद्मश्री पोपटराव पवार व ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रदेश संघचालक नानासाहेब जाधव, उद्योजक महेश झोडगे, अण्णा चौधरी, फिनिक्स फाऊंडेशनचे अध्यक्ष जालिंदर बोरुडे आदी उपस्थित होते.

लिलाबाई झोडगे या सर्वसामान्य कुटुंबातून येवून पतीच्या निधनानंतर बिकट परिस्थितीत भाजी विक्रीचा व्यवसाय करुन आपल्या मुलाला चांगले शिक्षण व संस्कार देऊन उद्योजक म्हणून घडविले. त्या सामाजिक व धार्मिक कार्यात सातत्याने योगदान देत आहे. त्यांच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य उद्योजक महेश झोडगे करत आहे. सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने त्यांनी मुलांना सुशिक्षित करुन घडविले आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले आदर्श माता पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे जालिंदर बोरुडे यांनी सांगितले.

महिला समाज घडविण्याचे कार्य करतात. महिलांनी राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुलेंच्या विचाराने मुलांवर संस्कार रुजविण्याची गरज आहे. लिलाबाई झोडगे यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे पद्मश्री पोपटराव पवार यांनी सांगितले.

# ज्ञानसंपदा शाळेत ८ जानेवारीपासून व्याख्यानमालेचे आयोजन

नगर – ८ ते १० जानेवारी रोजी ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी तसेच नगरकरांच्या विचारात भर पडावी, त्यांची वैचारिक प्रगल्भता वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने विविध क्षेत्रातील विचारवंत, साहित्यिक, ज्येष्ठ पत्रकार, लेखक इतिहासकार, कलाकार, प्रशासकीय अधिकारी, इत्यादींचे ज्ञानसंपदा व्याख्यानम ालेत व्याख्यानाचे आयोजन केले जाते. यंदा या व्याख्यानमालेचे चौदावे वर्ष आहे

यंदाच्या व्याख्यानमालेची पहिले पुष्प ८ जानेवारी रोजी ज्येष्ठ पत्रकार व वृत्त निवेदक डॉक्टर उदय निरगुडकर ध्यास सर्वोत्तमाचा या विषयावर गुंफणार आहेत. ९ जानेवारी रोजी व्याख्याते अभय भंडारी हे भारतीय सांस्कृतिक मूल्य व शिक्षण या विषयावर आपले मौलिक विचार मांडणार आहेत. तसेच १० जानेवारी रोजी प्रवचनकार गुरुदेव शंकर जी अभ्यंकर हे युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद या विषयावर आपले अलौकिक विचार मांडणार आहेत.


ठिकाण माऊली सभागृह झोपडी कॅन्टीन, सावेडी अहिल्यानगर येथे सायं ६.३० वाजता सुरू होईल.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिसबाबत आशेचा किरण

जगद्विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांनी अलीकडेच जगाचा निरोप घेतला. त्यांना इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिस हा दुर्धर आजार जडला होता आणि या व्याधीशी झुंज देतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर या आजाराविषयी बरीच चर्चा झाली. बहुतेकांना या आजाराविषयी माहिती असणे तर दूर, पण त्याचे



नावही ऐकलेले नव्हते. इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिस (आयपीएफ) हा एक गंभीर फुफ्फुसाचा आजार आहे.

या आजारामध्ये फुफ्फुसांमधील पेशीसमूह किंवा ऊती क्षतिग्रस्त होतात आणि पुढे जाऊन त्या कडक होतात. यामुळे फुफ्फुसांची क्षमता कमी होते. त्यांना योग्य प्रकारे काम करणे कठीण होते. परिणामी, शरीरासाठी आवश्यक असणारा प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन रक्तात मिसळणे कमी-कमी होत जाते. या आजाराची लक्षणे पाहिल्यास श्वास घेण्यात अडचण येणे, सतत कोरडा खोकला येणे, अत्यंत थकवा जाणवणे, वेगाने वजन घटणे, स्नायू आणि सांधेदुखीचा तीव्र त्रास होणे अशा प्रकारची काही लक्षणे रुग्णांना जाणवतात. आज वैद्यकशास्त्राने थक्क करणारी प्रगती केलेली असली तरी या आजाराचे मूळ कारण काय याबाबत कुणीही ठामपणाने सांगू शकत नाही. सर्वांत धोकादायक बाब म्हणजे या आजारावर आजघडीला क ो ण ते ही परिणामकारक औषध उपलब्ध नाहीये.

दुसरीकडे, या आजाराने ग्रस्त असणारा रुग्ण साधारणतः तीन ते साडे तीन वर्षे जगू शकतो, असे दिसून आले आहे. अर्थात, ही सरासरी आहे. काही रुग्ण त्याहून अधिक काळही जगू शकतात; पण हे जगणे वेदनादायी असते. अशा वेळी ॲलोपॅथी उपचारांच्या बरोबरीने होमिओपॅथी उपचारपद्धतीचा पूरक उपचारपद्धती म्हणून अवलंब केल्यास आयपीएफग्रस्त रुग्णाचे आयुष्य किमान वेदनादायी होऊ शकते. म्हणजेच ज्याला क्वालिटी ऑफ लाईफ किंवा जीवनाची गुणवत्ता वाढवता येणे शक्य होऊ शकते.

इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिस हा आजार सरसकटपणाने आढळताना दिसत नाही. काही हजार लोकांमध्ये एखाद्या व्यक्तीला तो होण्याची शक्यता असते. या आजाराची लागण झाल्यानंतर ऑक्सिजनचीच कमतरता भासू लागल्यामुळे रुग्णांना सतत दम लागतो. परिणामी, जगणे हे मरणप्राय बनते.

काही महिन्यांपूर्वी या आजाराने ग्रस्त असणाऱ्या ७९ वर्षांच्या एक महिला आमच्याकडे आल्या होत्या. त्यांना या आजारामुळे प्रचंड त्रास होत होता. होमिओपॅथीमध्ये जेव्हा एखाद्या आजाराचे कारण अज्ञात असते तेव्हा यामागे असू शकणाऱ्या काही मानसिक कारणांचे आकलन करून उपचार दिले जातात आणि त्याचे चांगले परिणाम दिसून येतात.

या महिलेमध्ये तशी कारणे आढळल्यानंतर होमिओपॅथी उपचार करण्यात आले आणि पूर्वी घरामध्ये चालणेही शक्य नसणारी ही महिला आज २००-३०० मीटर चालण्यास सक्षम बनली आहे. तसेच दिवसातून सहा ते आठ वेळा लावावा लागणारा ऑक्सिजनही आता बंद झाला आहे. स्टिरॉईडच्या डोसचे प्रमाणही आता कमी झाले आहे. दुर्मिळ आजाराने ग्रस्त असणाऱ्यांसाठी हा एक आशेचा किरण आहे. होमिओपॅथी उपचारांच्या या वैशिष्ट्यामुळे जगातील ८५ देशांमध्ये होमिओपॅथीचा लाभ घेत आहेत. या उपचारांमुळे इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिससारख्या दुर्धर व्याधी जडलेल्या रुग्णांना किमान वेदनांनी आणि चांगल्या गुणवत्तेचे आयुष्य जगता येऊ शकते.

**- डॉ. नितीन दर्डा**
संपर्क : ९४२०८ ६१४५७

## तृणभक्षक प्राण्यांची संख्या घटतेय

जसर्गिक अधिवासाचा ऱ्हास आणि बेसुमार शिकार याचा फटका जगभरातील अनेक वन्यप्राण्यांना यापूर्वीच बसलेला आहे. अजूनही वन्यप्राण्यांच्या अस्तित्वावरील धोका टळलेला नाही. जगात तृणभक्षक प्राण्यांची संख्या अनेक कारणांनी कमी होत असून, वन्य जीवन नष्ट होत आहे. वन्य प्राण्यांची संख्या नष्ट झाल्यामुळे उजाड माळरानांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. गेंडे, हत्ती व गोरिला यासारखे तृणभक्षक प्राणी नष्ट होण्याच्या मार्गावर असून, त्यांची संख्या ६० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. एकूण ७४ तृणभक्षी प्रजातींचा अभ्यास केला असता त्यांची संख्या शिकार व अधिवासाची हानी यामुळे कमी होत चालल्याचे दिसून आले. 'सायन्स ॲडव्हान्सेस' या नियतकालिकात याबाबतचे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे. यापूर्वीच्या अभ्यासातही तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येत अशीच घट दिसून आली होती.


आग्नेय आशिया व आफ्रिकेत वन्य प्राण्यांची संख्या कमी होत असून, युरोप व उत्तर अमेरिकेत अनेक तृणभक्षी प्राणी नष्टचर्याच्या मागच्या लाटेतच नष्ट झाले आहेत. ओरेगॉन स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. विल्यम रिपल यांच्या मते रेनडिअरपासून आफ्रिकी हत्तींपर्यंत अनेक प्राण्यांची संख्या कमी झाली आहे. प्रथमच या सर्व तृणभक्षी प्राण्यांचा एकत्रित अभ्यास केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. प्राण्यांची संख्या कमी झाल्यामुळे सवानाच्या जंगलात काही दिवसांनी उजाड माळरान दिसण्याची शक्यता आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या वन संवर्धन संशोधन विभागाचे प्रा. डेव्हिड मॅकडोनाल्ड व इतर २५ आंतरराष्ट्रीय वैज्ञानिकांनी याबाबतचा अभ्यास केलेला आहे. मांसभक्षक वाघ व सिंह यासारख्या प्राण्यांनाही शिकारीचा फटका बसत असून, त्यांचा अधिवासही कमी होत आहे. पण, या वैज्ञानिकांनी संशोधनात आणखी भर टाकली असून, जरी या प्राण्यांना अधिवास मिळाला तरी त्यांना खाण्यासाठी काहीच नसेल त्यामुळे ही परिस्थिती चिंताजनक आहे. संशोधनानुसार अधिवास नष्ट होणे, शिकार करण्यासाठी प्राणी नसणे, अन्न व साधनांसाठी स्पर्धा यामुळे प्राण्यांच्या संख्येत घट होत आहे. अवैध शिकारीने एकशिंगी गेंडा आफ्रिकेतून नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.



## चंद्रावर व्हायचे ज्वालामुखींचे विस्फोट!





चंद्रावर जवळपास १२ कोटी वर्षांपूर्वी ज्वालामुखीचे विस्फोट होत असत, असे एका नव्या संशोधनातून आढळून आले आहे. चीनने अंतराळातून आणलेल्या मातीच्या नमुन्याच्या आधारावर याचा शोध लागला आहे. शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, चांग-ई ५ या चीनच्या अंतराळ यानाने चंद्रावरील माती आणली होती. या मातीत दोन अब्ज जुन्या लावाचाही समावेश आहे. या लावाच्या माध्यमातून चंद्रावरील ज्वालामुखींची हालचाल आढळून आली. अर्थात, २ अब्ज वर्षांपूर्वीपर्यंतच हा प्रकोप होता. नंतर तो संपुष्टात आला, असा दावा यात करण्यात आला आहे.

चांग ई ५ अंतराळ यान ज्या क्षेत्रात उतरले, त्याला 'ओशनस प्रोसेलरम' असे म्हटले जाते. याचा अर्थ तुफानांचा महासागर असा होतो. हे क्षेत्र चंद्राच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अडीच हजार किलोमीटर्सपर्यंत विस्तारलेले आहे. या क्षेत्रात आताही काही प्रमाणात नवा लावा अस्तित्वात आहे आणि यामुळे तेथे ज्वालामुखी असण्याचे संकेत मिळतात, असे संशोधकांचे मत आहे. आतापर्यंत शुक्रावर ज्वालामुखी सक्रिय असल्याचे अनेकदा आढळून आले असल्याचे अनेक अभ्यासातून आढळून आले आहे. याशिवाय, मंगळावर विवरांची संख्या मोजून मोठ्या लावांची निर्मिती केव्हा झाली असेल, याचा शोध लावता येऊ शकतो, असाही संशोधकांचा दावा आहे. आतापर्यंतच्या अभ्यासातून चंद्राच्या अंतर्गत भागातील काही क्षेत्रात ज्वालामुखी सक्रिय असल्याचे संकेत मिळाले आहेत, हे देखील येथे उल्लेखनीय आहे.

यादरम्यान, चीनच्या ॲकॅडमी ऑफ सायन्सचे प्रो. युयांग यांनी चंद्रावर प्राचीन ज्वालामुखीचे अनेक पुरावे मिळाले असल्याचा येथे पुनरुच्चार केला. हे ज्वालामुखी किती काळ सक्रिय राहिले असतील, याचा अंदाज लावणे मात्र कठीण असल्याचे त्यांनी नमूद केले. चांग ई ५ यानातून जे नमुने आणले गेले त्यात काचेच्या ३ हजार मोत्यांचाही समावेश असल्याचे त्यांनी येथे सांगितले. त्याची रचना, ट्रेस-सत्व संरचना आणि ईन-सिटू सल्फर आयसो चटोपच्या विश्लेषणाच्या माध्यमातून ज्वालामुखीवर संशोधन केले गेले असल्याचे त्यांनी येथे स्पष्ट केले. चांग ई ५ या यानाने डिसेंबर २०२० मध्ये चंद्रावरून जवळपास १७३१ ग्रॅम नमुने आणले होते. या यानाने त्यावेळी चंद्राच्या पटलावरील १०० डिग्री सेल्सियसपेक्षा अधिक तापमानाचाही यशस्वी सामना केला. यातून आणलेले नमुने हे नासाच्या मानवरहित लूना मिशनच्या नमुन्याच्या तुलनेत १ अब्ज वर्षे जुने आहेत, हे देखील लक्षवेधी आहे.


## शोध सर्वात जुन्या ताऱ्याचा

खगोलवैज्ञानिकांनी आतापर्यंत ज्ञात असलेला सर्वात जुना तारा शोधून काढला असून त्याच्याभोवती पृथ्वीपेक्षा लहान आकाराचे पाच ग्रह फिरत असल्याचे दिसून आले. विश्व निर्मितीच्या प्रक्रियेवेळी या ग्रहांची निर्मिती झाली असावी. नासाच्या केप्लर दुर्बिणीने मिळवलेल्या माहितीच्या आधारे हा तारा व त्याचे ग्रह शोधण्यात आले आहेत.



ज्या ताऱ्याभोवती हे ग्रह फिरत आहेत त्याचे नाव केप्लर ४४४ असून त्याच्या भोवती पृथ्वीपेक्षा लहान आकाराचे पाच ग्रह फिरत आहेत. त्यांचा आकार बुध व शुक्र या ग्रहांच्या दरम्यानचा आहे. अतिशय जुन्या ताऱ्याभोवती हे ग्रह फिरत असून त्यामुळे तो एक विशेष तारा आहे, असे सिडनी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिजिक्सचे डॉ. डॅनियल ह्यूबर यांनी म्हटले आहे. विश्वनिर्मितीच्यावेळी हा तारा व ग्रहांची निर्मिती झाली. विश्वाचे वय एक पंचमांश असताना ही निर्मिती झाली. केप्लर ४४४ तारा हा सौरमालेच्या अडीच पटींनी जुना आहे. आपल्या सौरमालेचे वय त्यावेळी ४.५ अब्ज वर्षे होते. विश्वाच्या प्रत्येक अवस्थेत ग्रह ताऱ्यांची निर्मिती झाली आहे व नेमकी ही प्रक्रिया नेमकी केव्हा सुरू झाली याची माहिती यावेळी मिळेल, असे ह्यूबर यांनी सांगितले. पृथ्वीच्या आकाराचे ग्रह विश्वाच्या १३.८ अब्ज वर्षांच्या इतिहासात तयार झाले व त्यावरून प्राचीन दीर्घिकांच्या अस्तित्वाची माहिती मिळेल असे बर्मिंगहॅम विद्यापीठाचे डॉ. टियागो कॅम्पान्टे यांनी म्हटले आहे. ते व त्याच्या सहकाऱ्यांनी तारे व ग्रहांचे वय शोधण्याकरिता ॲस्ट्रोसिस्मॉलॉजी तंत्राचा वापर केला. या तंत्रात यजमान ताऱ्यात अडकलेल्या लहरींमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक संस्पदनांचा वापर केला जातो. संशोधकांच्या मते केप्लर ४४४ ताऱ्याभोवती हे ग्रह १० दिवसांत परिभ्रमण पूर्ण करतात. हा तारा सूर्य व पृथ्वी यांच्या अंतरापेक्षा त्याच्या ग्रहांपासून एक दशांशपेक्षा कमी अंतरावर आहे. तारा या ग्रहांच्या इतका जवळ असल्याने हे ग्रह वसाहतयोग्य नाहीत व तेथे पाणी असणे शक्य नाही.

## हे माहीत आहे का ?



- महाराष्ट्राचे सर्वात उत्तरेकडील टोक मध्य प्रदेश सीमेजवळ नंदुरबारमध्ये असून, सर्वात दक्षिणेकडील टोक कोल्हापूर जिल्ह्यात कर्नाटक सीमेजवळ आहे. छत्तीसगड सीमेजवळ पूर्वेकडील टोक गडचिरोली जिल्ह्यात आहे. पश्चिमेकडील टोक अरबी समुद्राजवळ पालघर जिल्ह्यात आहे.
- महाराष्ट्रातील सर्वात उंच ठिकाण म्हणजे कळसुबाई शिखर. ते नाशिक जिल्ह्यात असून, त्याची उंची १६४६ मीटर आहे.
- महाराष्ट्रातील सर्वात उष्ण ठिकाणांमध्ये नागपूरचा समावेश होतो. तिथे उन्हाळ्यातील तापमान बऱ्याच वेळा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत जाते. अकोला, चंद्रपूरमध्येही उन्हाळ्यात अतिशय जास्त तापमान असते.
- महाराष्ट्रातील सर्वात थंड ठिकाण म्हणजे नाशिकमधील निफाड, महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा अशी थंड हवेची ठिकाणेही प्रसिद्ध आहेत.
- महाराष्ट्रातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण म्हणजे आंबोली. आंबोलीला महाराष्ट्राचे चेरापुंजी असेही म्हटले जाते. तिथे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७५०० मिलीमीटर इतके आहे.
- महाराष्ट्रातील सर्वात कमी पावसाची ठिकाणे बीड, जळगावमध्ये आहेत.
- महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा अहमदनगर असून, सर्वात छोटा जिल्हा मुंबई शहर आहे.
- सर्वाधिक लोकसंख्या ठाणे जिल्ह्यात, तर सर्वात कमी लोकसंख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे.



## एलन मस्कची सुरक्षाव्यवस्था

टेस्ला, स्पेस एक्स आणि एक्स अशा बड्या कंपनीचे सर्वेसर्वा आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत सातत्याने अव्वल स्थानावर राहिलेले एलन मस्क सतत चर्चेत असतात. जगातील या सर्वात श्रीमंत उद्योगपतीची सुरक्षा व्यवस्था कशी आहे? किती बॉडीगार्डस् त्यांच्या सुरक्षेत असतात आणि त्यांच्या सुरक्षेवर किती खर्च येतो ? हे तुम्हाला माहिती आहे का?

एलन मस्क यांची सुरक्षा व्यवस्था हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. एलन मस्क यांना अनेकवेळा धमक्याही देण्यात आल्या आहेत. यामुळे त्यांच्या सुरक्षेबाबत २४ तास सतर्कता बाळगण्यात येते. मस्क यांच्याभोवती नेहमी २० बॉडीगार्डस्चं कडं असतं. पावलापावलावर हे बॉडीगार्डस् मस्क यांच्या सोबत सावलीसारखे असतात. मस्क यांची सुरक्षा इतकी सतर्क आहे की मस्क बाथरुमला जाणार असले तरी बॉडीगार्डस् बाथरुमपर्यंत त्यांच्या सोबत असतात. मस्क यांच्या सुरक्षा व्यवस्थेला वॉयेजर नाव देण्यात आलं आहे. यात काही बॉडीगार्डच्या हातात शस्त्र असतात तर काही बॉडीगार्डस् विना शस्त्राचे असतात. याशिवाय या टीममध्ये एक वैद्यकीय अधिकारी देखील असतो. मस्क यांना कुठेही जायचं असेल तर त्याआधी त्यांची सुरक्षा टीम सर्व प्लानिंग करतात. एलन मस्क यांच्या सुरक्षा व्यवस्थेवर करोडो रुपये खर्च केले जातात. न्यूयॉर्क टाईम्स आणि बिझनेस स्टँडर्डच्या रिपोर्टनासर २०१६ मध्ये एका महिन्यात मस्क यांच्या सुरक्षा व्यवस्थेवर १,६३,००० डॉलर म्हणजे भारतीय रुपयात १.३६ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. तर २०२३ मध्ये हाच खर्च २४ लाख डॉलर म्हणजे भारतीय रुपयात २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. २०२४ मध्ये यात ५ लाख डॉलरची वाढ झाल्याचं रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

## २४ सप्टेंबर २०२४ सर्वात जुना जिवंत प्राणी




कासवं दीर्घायुष्यी असतात, हे आपल्याला माहिती आहे; मात्र त्याचे सर्वात ठळक आणि मानवासमोर असलेले उदाहरण म्हणजे 'जोनाथन' नावाचे कासव. जोनाथन हा सेशेल्सचा विशाल कासव आहे, जो जगातील सर्वात जुना जिवंत प्राणी आहे. जगातील सर्वात जुना प्राणी म्हणून जोनाथनचे नाव गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले आहे. त्याचा जन्म १८३२ मध्ये झाला होता आणि २०२४ मध्ये तो १९२ वर्षांचा होणार आहे.

जोनाथन दक्षिण अटलांटिक महासागरात स्थित ब्रिटिश ओव्हरसीज टेरिटरीमधील सेंट हेलेना बेटावर राहतो. जोनाथनला १८८२ मध्ये सेशेल्समधून सेंट हेलेना येथे आणण्यात आले, तेव्हा तो ५० वर्षांचा होता. त्यावेळी त्यास गव्हर्नर सर विल्यम ग्रे-विल्सन यांना भेट म्हणून देण्यात आले होते. या कासवाने आपल्या आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना पाहिल्या आहेत, जसे की पहिले आणि दुसरे महायुद्ध, आणि त्याने सात ब्रिटिश सम्राट आणि ३९ अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना पाहिले आहे. मात्र, सध्या मोतीबिंदूमुळे जोनाथन आंधळा झाला असून, त्याची वासाची जाणीवही हरवली आहे. इतके वय झालेले असूनही, जोनाथन सक्रिय आहे आणि तो त्याच्या घेरात हळूहळू चालतो. जोनाथन त्याच्या वयाशी संबंधित अंधत्वामुळे गवत चरू शकत नाही. त्यामुळे त्याला गाजर, कोबीचा पाला, काकडी असा विशेष आहार दिला जातो. जोनाथनचे बहुतेक आयुष्य गव्हर्नरच्या घरात गेले आहे, जिथे त्याने इतर अनेक कासवांसोबत वेळ घालवला आहे. १८८२ ते १८८६ दरम्यान घेतलेल्या जुन्या छायाचित्रांमधून जोनाथनचे वय लक्षात येते. २०२२ मध्ये सर्वात जुने जिवंत प्राणी म्हणून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डद्वारे अधिकृतपणे त्याची नोंदणी केली गेली. तेव्हापासून आजतागायत या कासवाचा विक्रम अबाधित आहे.

# लाडक्या बहिणींना त्रासदायक ठरणारी देशी दारूचे लायसन्स्‌संदर्भात सरकारने भूमिका स्पष्ट करावी

नगर – लाडकी बहीण योजनेत होणारी तूट भरून काढायला लाडक्या बहिणींचे संसार उध्वस्त करणारी देशी दारू वाढवून पैसा उभा करण्याची अधिकाऱ्यांची ही मानसिकता अत्यंत नीच आणि संतापजनक आहे.

आज देशी दारूचे ग्राहक हे गरीब माणसे असतात. खेड्यातील कष्टकरी व शहरी झोपडपट्टीतील गरीब लोक ही देशी दारू पितात. त्यातून महिलांना मारहाण अत्याचार होतात. अनेक महिलांचे खून झालेत. अपघात आणि गुन्ह्यात आरोपी दारू पिलेले असतात हे अनेकदा सिद्ध झाले आहे. काल डंपरने गरीब चिरडले तो चालक दारू पिलेला होता. त्यामुळेच यापूर्वीच्या सर्व प्रकारच्या सरकारांनी विदेशी दारूचे लायसन वाटले पण गरीबांचे संसार उध्वस्त करणारी देशी दारू लायसन महाराष्ट्रात वेगवेगळ्या पक्षांची इतकी सरकारे ५२ वर्षात आली पण लायसन दिली नाहीत. पण आज इतकी उधळपट्टी केल्यानंतर सरकार या कारकिर्दीची सुरवात जर देशी दारू परवाने वाटून करणार असेल तर हे संतापजनक आहे

एकीकडे लाडकी बहिण हा जप करायचा, त्यांनी सरकार आणले म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांना पैसे देण्यासाठी गरीबांचे संसार उध्वस्त करणारी दारू विकून पैसे आणायचे हे अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. तेव्हा उपमुख्यमंत्री आणि उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी भूमिका स्पष्ट करून देशी दारूचे परवाने पुन्हा सुरू करणार का? हे सांगितले पाहिजे. त्याचबरोबर या महिलांचे भाऊ देवाभाऊ व एकनाथ भाऊ यांनीही भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

बंगलोर येथील प्रसिद्ध NIMHAN या संस्थेने केलेल्या अभ्यासात स्पष्टपणे मांडले आहे की दारुतून सरकारला जितके उत्पन्न मिळते त्यापेक्षा जास्त रक्कम ही सरकारला दारुतून निर्माण होणारे प्रश्न सोडवायला खर्च करावी लागते. दारूमुळे सरकारला आरोग्य आणि कायदा सुव्यवस्था यावर जास्त खर्च करावा लागतो. मनुष्यबळ कार्यक्षमता कमी होते. त्यातून आर्थिक नुकसान होते. अशावेळी दारूतून महसूल वाढतो या चुकीच्या विचारातून सरकारने बाहेर आले पाहिजे.

आज गरिबांच्या अंगावर दारू पिऊन गाडी घालणारे धनदांडगे सर्वत्र दिसत असताना राज्याचे सरकार दारू विक्री वाढवावी असा विचार कसा काय करू शकते? असा निर्णय घेतल्यास लाडक्या बहिणींची ती सर्वात मोठी फसवणूक ठरेल. त्यामुळे सरकारने तातडीने अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनेवर भूमिका जाहीर करावी. देशी दारू लायसन व विदेशी दारू लायसन वाढणार नाहीत हे लाडक्या बहिणींना स्पष्टपणे सांगितले पाहिजे, असे भारतीय जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे, शहराध्यक्ष रईस शेख यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# ठाकरे गटाचे आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी मुंबईत

**पक्षप्रवेशाबाबत होणार चर्चा, जाधव, खैरे, गायकवाड, कार्ले, झोडगे, मोकाटेंचा ठाकरे गटाला जय महाराष्ट्र?**

नगर – विधानसभा निवडणूक निकालानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगर शहरासह तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये काहीशी अस्वस्थता निर्माण झाली आहे. या अस्वस्थतेतूनच अनेक माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य पक्षाला सोडचिठ्ठी देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. त्या अनुषंगाने शहरातील तीन माजी नगरसेवक तसेच नगर तालुक्यातील काही माजी जिल्हा परिषद सदस्य शुक्रवारी (दि. ३) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी मुंबईला रवाना झाले आहेत.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला. तेव्हापासून आघाडीत घटक पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात चलबिचल सुरू झाली. अनेकांनी ठाकरेंना सोडून शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेशाची तयारी केली आहे. याच अनुषंगाने शहरातील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे यांच्यासह तालुक्यातून ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले, माजी सभापती रामदास भोर, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, गोविंद मोकाटे हे शिंदे गटाचे शहरप्रमुख सचिन जाधव यांच्याबरोबर मुंबईला रवाना झाले आहेत.

हे सर्व माजी नगरसेवक, जि.प. सदस्य दुपारनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहे. त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. पक्षप्रवेश आजच करायचा की इतरही अनेकजण पक्षात येणार असून, पुढील आठवड्यात सर्वांचा एकत्रित प्रवेश सोहळा करायचा याबाबत ना. शिंदे यांच्याशी चर्चा होणार आहे. ते जर म्हणाले की, आज आलेल्या सर्वांचा आजच प्रवेश करून घेऊ तर लगेच प्रवेश होईल. मात्र शहर आणि जिल्ह्यातील इतर येणाऱ्या सर्व जणांचा एकत्रित पक्षप्रवेश ठरल्यास पुढील आठवड्यात हा सोहळा होईल, अशी माहिती पक्षाचे शहरप्रमुख सचिन जाधव यांनी दिली आहे.

# रस्ता खराब झाल्याने नागरिकांची गैरसोय, लहान-मोठ्या अपघातांच्या घटनांमध्ये वाढ

**त्या ओपन स्पेसचे थांबलेले व मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती काम सुरु करा : ज्येष्ठ नागरिक संघाचे आयुक्तांना निवेदन**



त्या ओपन स्पेसचे थांबलेले व मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती काम सुरु करावे या मागणीचे निवेदन आयुक्तांना देताना ज्येष्ठ नागरिक संघाचे शिष्टमंडळ.

नगर – महापालिकेचे ओपन स्पेस विकसित करण्याचे थांबलेले काम पुन्हा सुरु करावे, वन विभागापासून ते दर्गा दायरा पर्यंतचा मुख्य रस्ता दुरुस्त करण्याची व पथदिवे बसविण्याची मागणी मुकुंदनगरच्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांच्या शिष्टमंडळाने आयुक्त डांगे यांची भेट घेऊन सदर प्रश्नांचा पाढा वाचला. याप्रसंगी हाजी खानसाहब उस्मानमियाँ, हाजी शेख रउफ, हाजी खान आलम, बशीर पठाण, हाजी शेख फकिर मोहम्मद, इस्माईल पठाण, हाजी शेख बिलाल, हाजी शेख अब्दुलकादीर, शेख अब्दुलरहिम (गोटु जहागीरदार), इब्राहिम पठाण, नवेद मिर्झा अंजुम, हबीब शेख, इकबाल सय्यद, अ‍ॅड. अनवर सय्यद, अब्दुल अजीज, गुलामदस्तगीर शेख, इस्माईल शेख, हाजी अब्दुल शेख सईद, आरिफ सय्यद नन्हेमियाँ, हाजी शरफोद्दीन शेख, हबीब पठाण, नुरमोहंमद सय्यद, अ‍ॅड. हाफिज जहागीरदार, अ‍ॅड. ताज सय्यद आदींसह परिसरातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

महापालिका हद्दीतील मुकुंदनगरच्या सर्व्हे नं. ३३८/१ मध्ये ओपन स्पेसचे महापालिकेच्या माध्यमातून नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०२३-२४ अंतर्गत हर्षल अग्रवाल यांच्यामार्फत विकसीत करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. सदर ठिकाणी सद्यस्थितीत काम थांबलेले असून, गेल्या दोन महिन्यापासून कामाच्या स्थितीत प्रगती नाही. तसेच छत्रपती संभाजीनगर रोड येथील वन विभाग कार्यालयापासून ते दर्गा दायरापर्यंतचा मुकुंदनगरमधील मुख्य रस्ता अत्यंत खराब झाला असून, जागोजागी खड्डे पडले आहेत. सदर रस्ता रहदारीचा असल्याने वाहनांची मोठी वर्दळ असते. या रस्त्यामुळे ज्येष्ठ नागरिक महिला, मुलांना अत्यंत अडचणीचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा लहान मोठे अपघात होत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यालय असलेल्या मेहराज मस्जिद जवळ पथदिवे नसल्याने संध्याकाळी या परिसरात अंधकार होत असून, ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तर मुकुंदनगर, प्रभाग क्रमांक ३ येथील सर्वे नंबर ३३८/१ मध्ये महापालिकेचे ओपन स्पेस विकसित करण्याचे थांबलेले काम पुन्हा सुरु करावे, वन विभागापासून ते दर्गा दायरा पर्यंतचा मुख्य रस्ता दुरुस्त करण्याची व पथदिवे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# मनपाकडून महिला बचत गटांना ५३ लाखांचे कर्ज

**१८ बचत गटांसह पथविक्रेत्यांनाही अर्थसहाय्य मंजूर; क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कर्ज मंजुरी पत्रांचे वितरण**



मनपाकडून महिला बचत गटांना कर्ज मंजुरीचे पत्र वाटप करण्यात आले.

नगर – अहिल्यानगर शहरातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, त्यांच्या व्यवसायांना चालना देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ त्यांना मिळवून देण्याचे काम महानगरपालिका करत आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त केंद्र महानगरपालिकेने स्थापन केलेल्या महिला बचत गटांना शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या ५३ लाख रुपये कर्ज मंजूर करत त्यांना मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच, शहरातील पथविक्रेत्यांनाही कर्ज मंजुरीची पत्रे देण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते १८ महिला बचत गटांच्या प्रतिनिधींना एक ते दहा लाखांच्या दरम्यान एकूण ५३ लाख रुपयांच्या कर्ज मंजुरीची पत्रे वितरीत करण्यात आली. तसेच, शहरातील दहा पथ विक्रेत्यांना प्रातिनिधीक स्वरुपात कर्ज मंजुरीची पत्रे देण्यात आली. यावेळी उपायुक्त संतोष टेंगळे, प्रियंका शिंदे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक आशिष नवले, स्टेट बँकेचे जिल्हा समन्वयक अमोल चावरे, शाखा व्यवस्थापक उपेश कुमार, युको बँकेचे अमित ठाकर, आयसीआयसीआय बँकेचे गोविंद गठलेवार, एनयुएलएम विभाग प्रमुख बाबासाहेब बेल्हेकर, शहर व्यवस्थापक निलेश शिंदे, सुप्रिया घोगरे, समुदाय संघटक अश्विनी रासकर, करिश्मा शेख, कांचन उमाप, हरिकृष्ण ठोंबरे आदी उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, आजच्या आधुनिक काळातही सावित्रीबाईंचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी सुरू केलेल्या चळवळींमुळे आज स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडली गेली आहेत. त्यांचे कार्य केवळ भारतीय समाजापुरते मर्यादित नाही, तर जागतिक स्तरावरही स्त्रियांना त्यांच्या अधिकारांबद्दल जागरूक करण्यासाठी प्रेरणादायी आहे. आज शिक्षणासह इतर विविध क्षेत्रात महिला आघाडीवर कार्यरत आहेत. अनेक व्यवसायातही महिलांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यामुळेच शहरात व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न महानगरपालिका करत आहे. आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे निमित्त साधून महिला बचत गटांना या योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे.



ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते आ. शिवाजीराव कर्डिले यांना हिंदू धर्मरक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# हिंदू धर्मरक्षक पुरस्काराने आ. शिवाजीराव कर्डिले सन्मानित

नगर – भिंगार येथील श्री शुक्लेश्वर मंदिर परिसरात महेश झोडगे मित्र मंडळाच्या वतीने श्री शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते आ. शिवाजीराव कर्डिले यांना हिंदू धर्मरक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महेश झोडगे, ह.भ.प.अमित धाडगे आदींसह नागरिक उपस्थित होते.

आमदार शिवाजीराव कर्डिले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीमधील माझा विजय हा हिंदू धर्मामुळेच झाला असून दोन वर्षांपूर्वी राहुरी तालुक्यात हिंदू बांधवांवर काही जातीवादी समाजकंटकांनी अन्याय केला त्यावेळी मी मताचे राजकारण न करता धावून गेलो आणि हिंदू धर्म वाचवण्यासाठी काम केले. राजकारणापेक्षा हिंदू धर्म टिकला पाहिजे आणि तो वाढवण्यासाठी सर्वांनी काम करावे. धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिक एकत्र येत असतात त्या माध्यमातून धार्मिकता जोपासली जाते. राज्यातील महायुतीचे सरकार हे महाराजांच्या धार्मिकतेच्या प्रचार व प्रसारामुळे आले आहे. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून श्री शिव महापुराण कथेचे आयोजन केले असल्यामुळेच नागरिक उपस्थित राहत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण हिंदू धर्म वाढीसाठी काम करीत आहे. आता माझ्यावर मोठी जबाबदारी पडली असून ती मी नक्कीच पार पाडेल, असे ते म्हणाले

# फायलींची ऑफलाईन पडताळणी झाल्यावर परवानगीसाठी ऑनलाईन सबमिट होणार

**नगररचना विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आयुक्तांची संकल्पना; ऑनलाईन फायली दहा दिवसात निकाली काढण्यासाठी महानगरपालिकेचे नियोजन**



नगररचना विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी आर्किटेक्ट इंजिनिअर असोसिएशन व नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली.

नगर – महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून दिल्या जाणाऱ्या परवानग्या, मंजुरीला विलंब होत असल्याने यात सुसूत्रता आणून कामकाजात गतिमानता आणण्यासाठी महापालिकेने नियोजन केले आहे. ऑनलाईन फाईल सबमिट करण्यापूर्वी त्या फायलींची ऑफलाईन पडताळणी केली जाईल. सर्व त्रुटी दूर करूनच ऑनलाईन फाईल सबमिट केली जाईल. या माध्यमातून ऑनलाईन फायली १० दिवसात निकाली काढता येतील व नागरिकांना वेळेत व जलद गतीने परवानग्या मिळतील, असे नियोजन करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

नगररचना विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी आर्किटेक्ट इंजिनिअर असोसिएशन व नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. यात फायलींची पडताळणी, छाननी, मंजुरी यासाठी लागणाऱ्या वेळेची माहिती घेण्यात आली. ऑनलाईन फाईल जमा होतानाच ती त्रुटीविरहीत असल्यास परवणागीला विलंब होणार नाही. त्यामुळे फायलींची ऑफलाईन पडताळणी आधी करून घ्यावी. त्यासाठी एकेका विभागासाठी आठवड्यातील एक दिवस/वार निश्चित करावा. त्यादिवशी संबंधित विभागाच्या क्लर्क, सहाय्यक नगररचनाकार, नगररचनाकार व सहाय्यक संचालक नगररचना हे एकत्र बसून छाननी करून त्रुटी काढतील. त्याची पूर्तता करूनच ऑनलाईन फाईल सबमिट होईल, असे नियोजन करावे, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

तसेच ३०० स्क्वेअर मीटरच्या आतील फायलींची पडताळणी, छाननी आर्किटेक्ट स्वतःच करून देतील. त्यानुसार महानगरपालिका नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी किंवा बांधकाम पूर्तता प्रमाणपत्र देईल. त्यासाठी संबंधित आर्किटेक्टला महानगरपालिकेत बंधपत्र, हमीपत्र द्यावे लागेल. महानगरपालिका याची पडताळणी करेल व त्यात त्रुटी आढळल्यास संबंधित आर्किटेक्टचा परवाना रद्द करण्यात येईल. असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले आहे. बीपीएमएस अंतर्गत ट्रेसिंग ड्रॉइंगसाठी आता थेट महानगरपालिकेच्या खात्यात नागरिकांचे पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न देखील वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सावेडीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यास पकडले

नगर – पक्षी व मानवी जिवास हानीकारक असलेल्या आणि महाराष्ट्र शासनाने विक्री व वापरावर बंदी घातलेल्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एकावर तोफखाना पोलिसांनी कारवाई करत ८ हजार ५०० रुपये किमतीचे नायलॉन मांजाचे १७ रीळ जप्त केले आहेत. सावेडी परिसरातील शिवनगर येथे ही कारवाई करण्यात आली.

तोफखाना पोलिसाना माहिती मिळाली आहे की, ओंकार उध्दव पुंड (रा. शिवनगर, महादेव नगर, अ.नगर) हा त्यांच्या राहत्या घराच्या आडोशाला नायलॉन मांजाची विक्री करत आहे. ही माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तेथे अचानक छापा टाकून ओंकार पुंड यास पकडले. त्याच्या घरात एका पिशवीमध्ये ८ हजार ५०० रुपये किमतीचे नायलॉन मांजाचे १७ रीळ मिळुन आल्याने ते जप्त केले.

या प्रकरणी पो.कॉ. सतिष भवर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून ओंकार पुंड विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम १२५, २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५,१५ सह म.पो.का. १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'विरुद्ध खोट्या तक्रारी करून बदनामी करणाऱ्या 'सिटीझन फॉर जस्टीस अ‍ॅण्ड पीस'वर कारवाईची मागणी

**अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून चौकशीचे आश्वासन**



महाराष्ट्र मंदिर महासंघाबाबत तक्रार करणाऱ्या संस्थेवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना देताना प्रतीक्षा कोरगावकर, अभिषेक भगत, अजिंक्य गायकवाड.

नगर – मंदिरांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि मंदिरांचे सुव्यवस्थापन सुनिश्चित करण्याच्या उदात्त उद्देशाने २४ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान शिर्डीत तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद' आयोजित करण्यात आली होती; मात्र तिस्ता सेटलवाड आणि फादर सेर्डिक यांच्या 'सिटीझन फॉर जस्टीस अ‍ॅण्ड पीस' (CJP) या संघटनेने या मंदिर परिषदेविरुद्ध खोट्या तक्रारी करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, अशी लिखित तक्रार मंदिर महासंघाच्या कु. प्रतिक्षा कोरगांवकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कोअर टीमचे सदस्य तसेच बुऱ्हाणनगर जगदंबा भवानी मंदिराचे प्रमुख अधिवक्ता अभिषेक भगत, स्वामी समर्थ केंद्राचे प्रतिनिधी अजिंक्य गायकवाड यांनी अहिल्यानगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे केली. या प्रसंगी अधीक्षक यांनी चौकशी करण्याचे आश्वासन तक्रारदारांना दिले. या वेळी अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी मंदिर, सब जेल चौकचे गणेश पलंगे उपस्थित होते. अशीच तक्रार शिर्डी पोलीस ठाण्यातही दाखल करण्यात आली आहे.

'महाराष्ट्र मंदिर महासंघ,' विरार येथील श्री जीवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा, आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या वतीने शिर्डीत शांततेत आणि यशस्वीपणे हा कार्यक्रम पार पडला. इतकेच नव्हे, तर २०२३ मध्ये जळगाव आणि २०२४ मध्ये ओझर (पुणे) येथेही यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सर्व आयोजनांमधून कोणाही अनुचित प्रकार घडलेले नाही, तसेच धार्मिक सलोखा बिघडलेला नाही.

तरीदेखील 'सिटीझन फॉर जस्टीस अ‍ॅण्ड पीस' या संस्थेने जाणीवपूर्वक खोट्या तक्रारी करून भारतीय संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र्य या मूलभूत हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न केला आहे. या संस्थेवर पूर्वीपासूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध खोटे आरोप करणे, बेस्ट बेकरी प्रकरणात साक्षीदारांना पैसे देऊन खोट्या साक्षी देण्यास भाग पाडणे, न्यायालयात खोटे पुरावे देऊन न्यायालयाची दिशाभूल करणे, संस्थेत आर्थिक गैरव्यवहार करणे, विदेशातील फंडिंगमध्ये घोटाळे करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे आरोप झालेले आहेत. त्यामुळे 'सिटीझन फॉर जस्टीस अ‍ॅण्ड पीस'कडून मंदिर परिषदेच्या विरुद्ध खोटी तक्रार करण्यामागे हिंदुविरोधी कटाचा भाग आहे का, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय फंडिंग घेतले आहे का, तसेच तरुणांची माथी भडकवण्याचा प्रयत्न होत आहे का, या सर्व गोष्टींची चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

'सिटीझन फॉर जस्टीस अ‍ॅण्ड पीस' ही संस्था पूर्वीपासूनच धार्मिक सलोखा बिघडविण्याचे काम करत असल्याचा आरोप आहे. जाणीवपूर्वक केवळ हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि हिंदुत्वनिष्ठ नेते यांच्या विरोधात तक्रारी करणे, खोट्या आरोपांची मालिका उभी करण्याचे प्रकार या संस्थेने केले आहेत. सदर तक्रारीची प्रत राज्याचे गृहमंत्री, पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तसेच शिर्डी पोलीस ठाणे यांना पाठवण्यात आली आहे.

# 'फूड फेस्ट फूडीज् मेला सिझन २' अहिल्यानगर शहरामध्ये सुरु

नगर – शहराच्या ऐतिहासिक स्थळांबरोबरच येथील विविध प्रकारच्या चविष्ट पदार्थ देखील तितकेच प्रसिद्ध आहेत. पापडभाजी, मिसळ पाव, लस्सी, शिपी आमटी असे अनेक अतुलनीय चवीचे पदार्थ आपल्या इथे प्रसिद्ध आहेत. ही खाद्यसंस्कृती वाढावी, जोपासावी या हेतूने सकल राजस्थानी युवा मंच व पेमराज सारडा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने फूडीज् मेला सिझन २ या फेस्टिव्हलचे आयोजन ३ ते ५ जानेवारी या काळात पेमराज सारडा कॉलेज ग्राउंड येथे होणार असल्याची माहिती 'नगर बदलतंय'चे धनेश खत्ती यांनी सांगितली.

तीन दिवस चालणाऱ्या या खाद्यमहोत्सवात रसिकांची सांस्कृतिक मनोरंजनाची भूक ही भागवली जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्राची संस्कृती, लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट व खाता खाता जिंकू आता. असे विविध मनोरंजनपर कार्यक्रम होणार आहेत. या माध्यमातून यात सहभागी होणाऱ्या नगरकरांसाठी सोन्याचे नाणे, पैठणी, मूव्ही टिकेट्स हे सरप्राईज गिफ्टस देण्यात येणार आहेत, अशी माहिती किरण गवते यांनी दिली.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी धनेश खत्ती, किरण गवते, भूषण ओस्तवाल, धनेश कोठारी, अमोल खोले, कपील शहा, मनोज चोपडा, अभिषेक शेलार, सागर मेहत्रे, संदेश मुनोत आदी सर्व परिश्रम घेत आहेत.

